शनिवार । १४ मार्च १९८१ । एक रुपया

# माणूस

## शेतकरी आंदोलन

या आंदोलनाचा शेवट यशानेच होणार आहे हे नक्की. पण नेतृत्वाचा कस यानंतरच खरा लागणार आहे. जादा भाव मिळाल्याने खेड्यांकडे वळलेला संपत्तीचा ओघ उत्पादक कामांसाठी कसा वापरता येईल ?

पृष्ठ...११




पृष्ठ....५

## राखीव जागा

# प्रश्न वचनपूर्तीचा आहे

केंद्रीय गृहमंत्री श्री· झैलसिग याचे अभिनंदन करण्याची पाळी सहसा कुणावर येत नसते; पण गुजराथच्या राखीव जागा विरोधी आदोलनाबाबत त्यानी जी ठाम आणि कणखर भूमिका घेतली, त्याबद्दल खरोखरच ते अभिनंदनास पात्र आहेत. राजकीय मतभेद या अभिनंदनाच्या आड येऊ नयेत. लोकसभेत यासंबंधीच्या चर्चेचा समारोप करताना त्यानी स्पष्टपणे सागितले की, ' मागास जाती व जमातीसाठी राखीव जागा ठेवण्याचा प्रश्न चर्चेने सोडवण्याजोगा नाही. राखीव जागा विरोधकानी आपली सर्व शक्ती पणाला लावून लढा दिला तरी या बाबतीत आम्ही कोणाशीही चर्चा करण्यास तयार नाही.' (सकाळ, ६ मार्च अंक) इंदिरा गांधीनीही हरिजनाच्या राखीव जागा प्रकरणी आपण वचनबद्ध आहोत, असे यापूर्वी सागितलेच आहे. हे वचन पूर्ण करण्यासाठी गुजराथमधील मेडिकल विद्यार्थ्यांनी सुरू केलेले राखीव जागाविरोधी आंदोलन कठोर उपाय योजून मोडून काढावे लागत असेल तर असे उपाय योजणाऱ्या शासनाला फालतू कारणासाठी विरोध करणे बरोबर नाही. घटनाकारानी सर्वांच्या वतीने राखीव जागाबाबतचे आश्वासन हरिजन व मागासलेल्या जातीना दिलेले आहे. सुरुवातीला दहा वर्षांसाठी हे आश्वासन दिले होते हे खरे आहे. पण पुढे ही मुदत वरचेवर कायदेशीररीत्याच वाढण्यात आली होती व या मुदतवाढीला त्या त्या वेळी बहुसंख्याकाची संमतीही लाभलेली होती. मध्यतरी जनता सरकार आले. या सरकारनेही ही मुदतवाढ रद्द केली नाही किंवा सोयीसवलतीचा कुठलाही संकोच केला नाही. तेव्हा सत्ताबदल झाला तरी हरिजनाना व मागासलेल्या घटकाना राखीव जागा ठेवाव्यात या मूलभूत धोरणाबाबत राष्ट्रीय एकमती आहे असे समजण्यास हरकत नाही. धोरणाच्या अमलबजावणीमुळे काही नवे प्रश्न उपस्थित झाले असतील, नवे ताणतणाव वाढले असतील तर मुळापासून या सर्व विषयाची पुन्हा व्यापक चर्चा होण्यात काहीच गैर नाही; पण असा पुर्नविचार म्हणजे दिलेल्या वचनाना हरताळ फासणे नव्हे. जी काही मुदत यापूर्वी बहुमताने ठरली असेल ती पूर्ण झाल्यावरच नवीन बदल अंमलात आणले जायला हवेत. तोवर समजा, जे काही अन्याय पुढारलेल्या समाजावर होत असतील ते सर्व सहन करायला हवेत. गैरसोयीबद्दल फारशी आरडाओरड करणे या पुढारलेल्या समाजाला मुळीच शोभा देणारे नाही. गुणवत्ता आणि बुद्धिमत्ता असलेली मूठभर मंडळी समजा, या राष्ट्रीय वचनपूर्तीमुळे थोडी-फार कुचंबणार असतील तर अशा कुचंबणेकडे काही काळ दुर्लक्ष करायला हरकत नाही. गुजराथपुरते बोलायचे तर या राज्यातून पुढच्या दहा–पाच वर्षांत, पुढारलेल्या वर्गातले एम्. डी. किंवा एम् एस्. डॉक्टर्स थोडे कमी बाहेर पडले, तर देशाचे असे काय मोठे नुकसान होणार आहे ? नाही तरी वरच्या पदव्या मिळवून ही बुद्धिमान व गुणवत्ता असलेली श्रीमंताची मुले इंग्लंड-अमेरिकेत पळण्याची पहिली सधी घेणारीच अधिक असतात. अमेरिकेने हाकलायला सुरुवात केली की, जे देश याना आत घ्यायला तयार असतील त्या देशाकडे धाव घ्यायचीही यापैकी बहुतेकाची तयारी असतेच. अशा परदेशपटूच्या कुचंबणेचे स्तोम या गरीब देशाने किती प्रमाणात माजवावे, याला काही मर्यादा हवी व या मर्यादेपलीकडे अशांच्या आरडाओरडीला, आंदोलनाना समाजाने, सरकारने बिलकूल किंमत देऊ नये. राखीव जागा भरल्याच जात नसतील तर अशा जागा वर्षानुवर्षे मोकळ्या ठेवणे किंवा बॅक लॉग वाढवत नेण्याचे दुसरे टोक गाठावे, असाही याचा अर्थ नाही. मूलभूत धोरणाची चौकट साभाळून असे अन्याय दूर करीत राहणे, याबाबत तडजोड, देवाण-घेवाण करणे शक्य असते व तसा लवचिकपणा स्थानिक व क्षेत्रीय पातळीवर दाखवणे आवश्यकही आहे; पण गुजराथचे विद्यार्थी मूलभूत चौकटच मोडायला निघाले; सुरुवातीला वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशातील अन्यायापुरते मर्यादित असलेले त्याचे आदोलन सर्व राखीव जागा विरोधी आदोलन बनले. हा आक्रस्ताळेपणा होता व तो वेळीच आवरला नसता तर गुजराथबाहेरही या वर्ण-विद्वेषाच्या ज्वाला पसरल्या असल्या. वेळीच केंद्रसरकारने व गुजराथ सरकारने खंबीर


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : एकेचाळिसावा

१४ मार्च १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

उपाययोजना केली म्हणून हा धोका तात्पुरता तरी टळला आहे. सहा महिने गुजराथमधील सर्व वैद्यकीय महाविद्यालये धाडकन बंद करून टाकण्याचा निर्णय काहीना उतावळेपणाचा किंवा जादा कडकपणाचा वाटेलही; परंतु या प्रश्नाबाबत सरकारचा निर्धार त्यामुळे प्रथमपासूनच स्पष्ट झाला व आंदोलनावर सरकारचा लवकर कबजा बसला.

राष्ट्रीय सुरक्षा कायद्याचा वापर मात्र अनावश्यक म्हटला पाहिजे. तो राजकीय नेत्यासाठी वापरला जाणार नाही असे स्पष्ट आश्वासन सरकारतर्फे दिले गेले असताना‌ही तो या प्रसंगी वापरला गेला, याची निषेधयुक्त नोंद येथे केली पाहिजे.

¤

राखीव जागापद्धती निर्दोष आहे, तिच्यात सुधारणा करण्यास काही वाव नाही असा मात्र याचा अर्थ नाही मूठभर उच्चवर्णीयांचे या पद्धतीमुळे काही खरे किंवा खोटे नुकसान होते म्हणून नाही तर दलितांच्या विकासाला ही पद्धती मारक ठरू नये म्हणून तिच्यात वेळोवेळी सुधारणा व बदल करणे योग्यच ठरेल. एका विशिष्ट मुदतीनंतर तिची आवश्यकताच राहू नये अशा दृष्टीने या सुधारणा वा बदल केले जावेत. असे सांगितले जाते की, राखीव जागांचा फायदा दलितामधील नव्याने श्रीमंत व प्रतिष्ठित झालेला एक लहानसा वर्ग उपटत राहतो व बहुसंख्य दलितांपर्यंत या सवलती, हे लाभ पोचतच नाहीत गुजराथच्या सध्याच्या दंगलीतील एक आकडेवारी या दृष्टीने बोलकी आहे. गुजराथच्या डिप्रेस्ड क्लासेस लीगचे अध्यक्ष श्री. डायाभाई परमार यांनी अशी तक्रार मांडली आहे की, चालू दंगलीत मागास व हरिजन समाजाच्या मालमत्तेचे सुमारे ७ कोट रुपयांचे नुकसान झाले आहे कलोल शहरात एका हरिजन कुटुंबाचे घर लुटण्यात आले. त्यात ७० हजारांची रोकड पळवली गेली. (पहा–टाइम्स ऑफ इंडिया, ८ मार्च ८१ अंक, पृष्ठ ९) आता ७ कोट रुपयांचे नुकसान ज्या वर्गाचे होते तो मागासलेला कसा असा प्रश्न साहजिक कोणी विचारू शकतो. तसेच, ७० हजार रोकड जवळ बाळगणारे कुटुंब तसे सधनच मानले पाहिजे. अशा मूठभर व नव्यानेच श्रीमंत झालेल्या वर्गाविषयी इतरांच्या मनात काही आकस निर्माण झाला असेल तर तेही मनुष्यस्वभावाला काही फारसे सोडून नाही. तसाच दुसराही एक आक्षेप या राखीव जागा–सवलतीबद्दल घेतला जातो. अशा राखीवतेमुळे या मागास वर्गात अलगतेची भावना वाढीस लागते व व्यापक सामाजिक-सांस्कृतिक प्रवाहापासून हे वर्ग, हे गट दूरदूरच जात राहतात. बी. टी. रणदिवे हे डावे कम्युनिस्ट पुढारी राखीव जागा विरोधी आंदोलनात त्यांची सहानुभूती दलितांच्या बाजूने असणार हे उघड आहे. तरी त्यांनी एके ठिकाणी लिहिले आहे– 'राखीव जागांच्या तरतुदीचा दुसरा एक विपरीत परिणाम आज आपल्याला दृष्टीस पडतो. सत्ताधारी पक्षाकडून आणखी काही मामुली सवलती पदरात पाडाव्यात या उद्देशाने त्या पक्षाला सतत पाठिंबा देणारा एक वर्ग आज अस्पृश्यवर्गात तयार होत आहे सवलतीचे अक्षरश आमिष दाखवून इंदिरा कांग्रेसचे काही नेते ह्या दीनदुबळ्या हरिजनांचा राजकीय पाठिंबा कांग्रेस पक्षाला मिळावा म्हणून प्रयत्न करीत आहेत व जनतेच्या जमीनदार – भांडवलदारविरोधी लोकशाही लढ्यापासून, देशातील डाव्या शक्तीपासून त्यांना चार हात दूर ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न कसोशीने चालू आहे.' (पहा–जीवनमार्ग, १ मार्च १९८१ अंक, पृष्ठ६) जी तक्रार रणदिव्यांची आज आहे तीच यापूर्वी व आताही राष्ट्रवाद्यांचीही होती व आहे. 'केवळ जातीच्या आधारे विशेष हक्क चालू ठेवण्यामुळे स्वत चे वेगळे अस्तित्व कायम ठेवण्यातच आपला लाभ आहे अशी भावना त्या जातीमध्ये निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. उर्वरित समाजाशी एकरस होण्याच्या मार्गात ही भावना निश्चितच बाधारूप ठरेल '–अशी या राखीव जागाप्रकरणी सध्याच्या गुरुजींची भूमिका होती व 'हरिजन' हा वाच्यार्थाने चांगला असला तरी वेगळेपणाची भावना जोपासणारा शब्द वापरू नये असे त्यांचे मत होते. या शब्दप्रयोगाविषयीची आपली आशंका त्यांनी गांधीजीजवळ एका भेटीच्या प्रसंगी व्यक्तही केली होती. (पहा–विचारधन, दुसरी आवृत्ती, पृष्ठ ३२२)

पण हे जरी खरे असले, वरील दोन्ही आक्षेपात जरी तथ्यांश असला तरी दलितांना, मागासलेल्या समाजघटकांना समान व काही क्षेत्रात विशेष संधी नाकारण्यासाठी या आक्षेपांचा वापर केला जाऊ नये, हेही पाहिले पाहिजे. शेवटी निर्दोष अशी कोणतीच पद्धती अस्तित्वात नसते. इतर क्षेत्रात तरी धोरणे कशी ठरवली जातात ? मोठ्या उद्योगधंद्यांपासून लहान किंवा ग्रामीण उद्योगाचे संरक्षण करण्याचा प्रश्न घ्या. तेथे आपण राखीव क्षेत्राची पद्धतच स्वीकारत असतो. हातमागासाठी काही कापडप्रकार राखून ठेवले नाहीत तर गिरण्यांच्या कापडापुढे, त्यांच्या प्रचंड जाहिरातबाजीपुढे हातमाग टिकून राहणे शक्यच नाही आणि हातमागांना मरू दिले, खुल्या स्पर्धेला वाव दिला तर या हातमागक्षेत्रात असलेल्या लाखो मजुरांना दुसरा कोणता रोजगार आपण देऊ शकतो ? असा रोजगार नसल्यामुळे हातमाग चालू ठेवणे आवश्यक ठरते. गुणवत्ता किंवा कार्यक्षमता मोठ्या उद्योगधंद्याच्या मानाने थोडी कमी असली तरी असे लहान घटक जपायचे म्हणजे 'राखीवतेची कुरणे' हाच मार्ग सध्या तरी उपलब्ध आहे. या दृष्टीने या दलितांच्या राखीव जागाप्रकरणाकडे पाहिले पाहिजे. अधिक चांगला पर्याय नाही म्हणून आणि मुख्य म्हणजे देशाने दिलेले अभिवचन पूर्ण व्हायला हवे म्हणून, काही दोष असले तरी, उद्‌घोषित मुदत संपेपर्यंत तरी ही राखीव जागापद्धती राबवली पाहिजे. यासाठी पुढारलेल्या समाजघटकांनी थोडा त्याग करायला लागला तरी तो केला पाहिजे. तो स्वयंप्रेरणेने करणे केव्हाही चांगले; पण तिचा अभाव असेल तर काही काळ सक्ती अपरिहार्य म्हणून स्वीकारली पाहिजे.

–श्री. ग. मा.


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

मुक्ताफळे

# ‘राखीव जागा रद्द करा !’

## – चंपू चितळे

जरा उशिरच झाला’हो ! पण सर्वजण ज्याची वाट पहात होते, ते विचारवंताचे राखीव जागांबद्दलचे पत्रक अखेर निघाले. स्वाक्षरी करणाऱ्यात नेहमीचे दोन-तीन मानकरी गायब आहेत. चालायचेच. बहुधा ते फोनवर भेटले नसतील किंवा वैचारिक प्रगल्भनाकरता ते बाहेरगावी गेलेले असावेत. या विचारवंताच्या सह्या गोळा करणारा स्वयंसेवक एकदा चुकून आमच्या घरी आला. ‘दोन-चार विचारवंत पुण्याबाहेर गेल्याने तुम्हाला ‘सकाळ’मध्ये नाव छापून येण्याचा चान्स आहे–’ हे त्याने सागताच आम्ही प्रथम फटकन सही करून टाकली व नंतर पत्रक कशाबद्दल आहे वगैरे मामुली प्रश्न विचारले. स्वयंसेवक म्हणाला–

‘अहो, समाजात रोज प्रश्न निर्माण होतात. विचारवंताच्या सह्या गोळा करण्याचे काम मोठे जिकिरीचे असते. एक पुण्याच्या या टोकाला रहाणार तर दुसरा त्या टोकाला ! बहुसंख्य विचारवत हे फोनधारक आहेत व यामुळे फोनवरून सही मिळवता येते हे त्यातल्या त्यात सुख ! ज्या विचारवंताकडे फोन नाही त्यांना मी बहुधा गाळतो ! पण फोनवरचे तरी फोनवर मिळायला हवेत ना चटचट...’

‘पण ही सर्व मंडळी एकत्र सापडतील अशी काही सोय करता येणार नाही का ? मुबईला कसे ? ‘साहित्यसहवास’मध्ये गेले की सह्याना काय तोटा ! ’

‘मी तेच सुचवणार आहे. पुण्याला एक ‘स्वाक्षरीभवन’असण्याची नितात गरज आहे. पुण्यातील सर्व विचारवंत इथे रोज सकाळी ८ ते ८।। जमतील. सरकारने म्हणजे ए. आर. अतुले यांनी यासाठी सरकारी जागा व भवन बाधण्यासाठी पाच लाख देणगी द्यावी. तुम्ही म्हणाल लहानसे भवन बांधायला इतके पैसे कशाला ? त्याचे असे आहे– विचारवंत ह्या पत्रक काढून समाजाची सेवा करीत असतो गोंधळलेल्या अल्पमती जनतेला मार्गदर्शन ही काही लहान समाजसेवा नाही ! सकाळ-सकाळी स्वाक्षरीभवनात येणाऱ्या विचारवंताला यासाठी सरकारने नास्ता-चहा देणे अगदी आवश्यक आहे. नाही तर काही जण पुन्हा फोनवरून सही देतो म्हणतील !

राखीव जागांच्या प्रश्नावरील पुण्यातील विचारवंताची लाबलचक यादी वाचताना, आम्हाला त्या स्वयंसेवकाचा चेहरा समोर दिसत होता. खरं पहाता सही देणे हे सेकंदाचे काम प्रश्न काय आहे ? त्याच्या बाजू काय आहेत ? त्यावर तोडगा काय ? वगैरे ऊहापोह करण्याची जबाबदारी नसते. ‘लोकानी अमुक अमुक करावे’ असा आदेश देणारे किंवा कुणाचा तरी निषेध करणारे, असे हे पत्रक असते. यामुळे ‘स्वाक्षरीभवन’ ताबडतोब बाधणे आवश्यक आहे. ए. आर. अंतुले यानी ते मनावर घ्यावे.

हा राखीव जागाचा जो प्रश्न आहे, त्याबद्दल सामान्य माणसाना–विविध क्षेत्रांतील सामान्य माणसाना–काय वाटते हे समजून घेण्यासाठी आम्ही काही मुलाखती घेतल्या. विचारवंतानी केलेल्या प्रबोधनात ही मोलाची भर ठरावी.

### १. चंपू चितळे

चंपू ! एक अल्लड-देखणे व्यक्तिमत्त्व. वय असेल १७–१८. खेळांची आवड. कॉलेज-विद्यार्थिनी. प्रेमविवाह व्हावा– ‘दाखवून घेतल्याशिवाय’ इतकाच अर्थ– हे स्वप्न पहाणारी भावुक डोळ्याची. हवीहवीशी वाटणारी, म्हणजे मैत्रिणीना ! आम्ही गेलो तेव्हा ती खेळाच्या मैदानाकडे निघाली होती. टी. व्ही. च्या मुलाखतीप्रमाणे आम्ही एकदम एकेरीवर आलो.

‘चंपू, तुला असं वाटतं का– म्हणजे विचारपूर्वक असं वाटतं का, की राखीव जागा असाव्यात ?’

मला असं वाटतं की, राखीव जागा असताच कामा नयेत. आता आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट सामन्यात आणि तत्पूर्वी शालेय क्रिकेट सामन्यात, मला नेहमीच ‘राखीव’ ठेवण्यात आले. परवा हैद्राबादला विद्यापीठाचा संघ गेला. पुनः मी आपली राखीव! किती वर्षं आम्ही राखीव रहायचे ? एक जण मेली सामन्याच्या पहिल्या दिवशी सुरुवातीलाच आजारी पडेल तर शपथ ! क्षेत्ररक्षण करताना मात्र अधनमधून सगळ्या आजारी! आम्ही आहोतच क्षेत्ररक्षण करायला उन्हात ! राखीव जागा रद्द करून सर्वांना समान संधी मिळायला हवी. एदलजी, शाता रगास्वामी अगदी जरी चांगल्या खेळल्या, तरी त्याना काढून टाकून आमच्यासारख्या राखीव मुलीला संधी मिळायलाच हवी ! नेहमी नेहमी आपल्या आम्हीच राखीव काय म्हणून ?’

चंपूचा प्रश्न सडेतोड होता. निवडसमितीत कुणी विचारवंत असल्यास त्यांनी विचार करावा.

### २. भागोजी सुदाम गायकवाड

भागोजी. एक उमदा खेळाडू. मागास जातीत जन्मल्याने, क्रिकेटचा सराव करता आला नाही. तरीही टेनिसच्या चेडूने खेळलेल्या पहिल्याच सामन्यात ३७ धावा करून ७ गडी बाद करण्यात यश. क्रिकेटचे विलक्षण वेड. सर्व कसोटी सामने मुखोद्गत. सध्या एका औद्योगिक कारखान्यात कामगार. कारखान्याच्या क्रिकेटटीमचे गावसकर ! आम्ही गायकवाड यांना भेटलो तेव्हा ते ट्रान्झिस्टरला कान लावून न्यूझिलंड-भारत पहिली कसोटी ऐकत होते

‘गायकवाड, राखीव जागांबाबत तुम्हाला काही म्हणायचं असेल. काय म्हणायचं आहे तुम्हाला–?’

‘क्रिकेट हे एक असे क्षेत्र आहे की, जिथे शतकानुशतके दलितांवर अन्याय झालेला आहे एक पी. विठ्ठल आणि नंतर त्यांचा मुलगा वाय. बी. पालवणकर सोडले तर नाव घेण्यासारखा एकही दलित दिसत नाही ! कोण याला जबाबदार ? आज कसोटी खेळाडूंची निवड प्रातवार होते. चार मुबईचे. दोन दिल्लीचे. एक बंगालचा. दोन कर्नाटकचे. आमची मागणी आहे तीस टक्के जागा आम्हा दलितांना मिळाल्या पाहिजेत ! प्रश्न संधीचा आहे. मला संधी मिळाली असती तर मी न्यूझिलंडविरुद्ध असा फज्जा उडू दिला नसता. साले एकूणसाठ रन्सनी हरतात !’

‘पण मला वाटलं गायकवाड, संधी न मिळणारे दलित सोडून इतर वर्गातही बरेच खेळाडू आहेत. तेव्हा संधी मिळवावी लागते.

ती मिळाली तरी धावा कराव्या लागतीलच.'

'सध्दी मिळालेले सगळे धावा करत आहेत का? हा विश्वनाथ–१४, ५, २, ०, ९, १, ५–काय झालं अॅव्हरेज?'

गायकवाडचा प्रश्न अस्वस्थ करणारा होता. समजा, आजच कसोटीसंघात तीस टक्के भरण्याइतके खेळाडू उपलब्ध झाले नाहीत–तर बॅक लॉग भरायचा प्रश्न पुढे येईल. तेव्हा वेळीच राखीव जागा निर्माण करून या क्षेत्रात शतकानुशतके जो अन्याय चालू आहे त्याविरुद्ध विचारवंतांनी खंबीरपणे उभे राहावे व पुढील भयानक प्रसंग टाळावेत.

### ३. इन्स्पेक्टर जाधव

इन्स्पेक्टर जाधवाची एक मुलाखत आम्ही पूर्वी 'माणूस'मध्येच प्रसिद्ध केली आहे. तेव्हा त्यांचा नव्याने परिचय देण्याची गरज नाही. एक कार्यतत्पर पोलीसअधिकारी इतका परिचय पुरे आहे.

'राखीव जागांबाबत–जाधवसाहेब, आपले मौलिक विचार ऐकण्याची इच्छा आहे. एकवणार?'

'हो. का नाही? परवा मुबईत प्रा. शांतादेवी याचा खून झाला. का झाला? स्त्रियाचा राखीव डबा याला कारण आहे. राखीव डबा असला की, त्यातून प्रवास करण्याचा मोह स्त्रियांना होणार. शांतादेवीना तो मोह झाला आणि बिचाऱ्या प्राणास मुकल्या! यावर उपाय एकच–लोकल गाडघाना स्त्रियाचा राखीव डबा नसावा!'

'पण मग गर्दीच्या वेळी स्त्रियांना डब्यात कसे चढता येईल?'

'आज चढता येते असे वाटते तुम्हाला? स्त्रियाच्या डब्यात उनाड पोरे चढतात, मवाली चढतात. शिवाय बायका-बायकात मारामाऱ्या होतात. दुर्बल घटकात मारामाऱ्या लावून, दुर्बल घटक अधिक दुर्बल करणारा स्त्रियाचा राखीव डबा तावडतोब रद्द झाला पाहिजे–हाच यावर उपाय आहे!'

### ४. मेहरुन्निसा अब्दुल काझी

श्रीमती काझी याचेबद्दल आम्ही काही सांगू शकत नाही. त्या आमच्याशी बुरख्यातून बोलत होत्या.

'मिसेस काझी, राखीव जागांबाबत आपल्याला काही मार्ग दिसतो का?'

'आम्हाला स्त्रियांच्या राखीव डब्यातही चढता येत नाही. आधी मुबईचा उकाडा. त्यात हा गोषा. गोषा न पाळणाऱ्या स्त्रिया धक्काबुक्की करून चढू शकतात आम्ही काय करावे? तेव्हा प्रत्येक गाडीला फक्त गोषाधारी स्त्रियाकरता एक स्वतत्र राखीव डबा असावा!'

'मला वाटतं आपण जर गोषातून बाहेर आलात, तर हा राखीव जागाचा प्रश्न निर्माण होणार नाही.'

'कैसी बाते करतो हो शातादेवी गोषा रखती तो डाकूसे कैसा मालूम पडता, की गलेमें सोनेका गहना है! मर गयी ना बेचारी...'

¤

सरतेशेवटी राखीव जागा पत्रकावर सही करणाऱ्या एका विचारवताचीच आम्ही त्याच्या न कळत मुलाखत घेतली. त्याचा परिचय आम्ही सांगत नाही.

'प्राध्यापक × × ×, आपण विचारवंतांच्या पत्रकावर सही केली आहे.'

'सरदाराची सही आहे, एस्. एम्. ची आहे, गोऱ्याची आहे, आढावाची आहे, म्हणून मीपण केली!'

'साधारणपणे किती वर्षं राखीव जागा असाव्या असे आपल्याला वाटते? अजून ५० वर्षे?'

'मी यावर विचार केलेला नाही.'

'हे जे अनिष्ट आंदोलन गुजराथेत सुरू झाले ते प्रथम सरसकट सर्व राखीव जागांविरुद्ध नव्हते. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश देताना राखीव जागा असण्यास विद्यार्थ्यांचा विरोध नाही; परंतु एम्. डी., एम्. एस्. चे प्रवेश फक्त गुणवत्तेवर द्या, अशी त्याची मागणी होती.

'असं का? मला वाटलं. सगळ्या राखीव जागाबद्दल आदोलन आहे. मी काही सर्व नीट वाचलेले नाही!

'वैद्यकीय पदव्युत्तर परीक्षेतील प्रवेशासाठी व नोकरीतील प्रवेशानंतरच्या जबाबदारीच्या जागासाठी गुणवत्ता हाच निकष असण्याला आपली काही हरकत आहे का? जबोजेटचे पायलट गुणवत्ता विचारात न घेताच नेमले, तर आपल्याला चालत का?'

'नाही बुवा! असं जर झालं ना की, गुणवत्ता हाच निकष मानला तर माझा मिटेल. पण याबाबतीत मी एकदा सरदाराशी सविस्तर बोलणार आहे मग नक्की काय ते सांगेन.'

'आता एकच प्रश्न. आर्थिक दुर्बल घटकाना प्राधान्य द्या, असे आपण पत्रकात म्हटले आहे. आर्थिक दुर्बल घटकाची आपली व्याख्या काय?'

'अर्थशास्त्राचा काही जास्त अभ्यास नाही; पण आर्थिक दृष्टचा दुर्बल म्हणजे, साधारणपणे, नाही, पण तसं नाही सागता येणार. एकदा एस्. एम्. किंवा नानासाहेबाशी बोलले पाहिजे'

तर अशा या मुलाखती! या घेतल्यानतर आमच्या मनातल्या या प्रश्नावरचा गोधळ कमी झाला आहे. वाचकांच्या मनातही या मुलाखती वाचल्यावर गोधळ रहाणार नाही, अशी आमची खात्री आहे!

–ग्यानबा

---

# रशिया

## ब्रेझनेव्हपुढील प्रश्न

वा. दा. रानडे

रशियन कम्युनिस्ट पक्षाची सव्वीसावी काँग्रेस मॉस्कोत नुकतीच झाली. रशिया म्हणजे कम्युनिस्ट क्रांतीचा अग्रदूत. स्टालिनच्या निधनापर्यंत जागतिक कम्युनिस्ट चळवळीचा मार्गदर्शक म्हणून रशियन कम्युनिस्ट पक्षाकडे पाहिले जाई. जागतिक कम्युनिस्ट चळवळीचे ते मुख्य केंद्र किंवा पीठ होते; पण पुढे कम्युनिस्ट चळवळ एककेंद्रीत राहिली नाही. स्टालिनच्या काळातच टिटोनी बडाचा झेंडा उभारला होता. सर्व देशातील कम्युनिस्ट पक्षांनी रशियाचेच धोरण किंवा मार्ग न अनुसरता आपापल्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार वेगळा मार्ग चोखाळण्याची मोकळीक त्याना हवी, ही टिटोच्या संघर्षामागील मुख्य बैठक होती पुढे रशिया व चीन याच्यात वैचारिक सघर्ष होऊन चीनने वेगळा मार्ग अनुसरला पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट पक्षानी तर कामगारवर्गाच्या हुकुमशाहीचे

तत्त्व सोडून संसदीय लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणण्याचे तत्त्व स्वीकारले. ही बदललेली परिस्थिती लक्षात घेता जागतिक कम्युनिस्ट चळवळीचा मार्गदर्शक म्हणून रशियन कम्युनिस्ट पक्षाला व त्याच्या नेत्याला महत्त्व राहिले नाही. सव्विसाव्या काँग्रेसबद्दल म्हणूनच फारस औत्सुक्य नव्हतं.

पण या कारणासाठी औत्सुक्य नसले तरी जगातील दुसऱ्या क्रमाकाची बडी सत्ता म्हणून या दशकात रशियाचं काय धोरण राहणार? रशियाचे उद्देश काय आहेत? रशिया-अमेरिका-संबंधाना कोणते वळण मिळेल? तणाव वाढून जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले जाईल काय? ब्रेझनेव्हनंतर त्याचेच धोरण पुढे चालू राहील की नवे नेते नवे धोरण स्वीकारतील? रशिया-चीन संघर्ष चालूच राहील की त्यालाही नवे वळण मिळेल? अनेक पक्षाना मोकळीक देणारी पाश्चात्य पद्धतीची लोकशाही रशियात येण्याची कितपत शक्यता आहे? या प्रश्नाची उत्तरे, निदान काही दिशा मिळते काय, या दृष्टीने या काग्रेस कडे पहायला हवे.

पक्षावर ब्रेझनेव्हच्या नेतृत्वाची घट्ट पकड आहे हे या काँग्रेसमध्ये स्पष्टपणे दिसून आले. ब्रेझनेव्ह याची प्रकृती बरी नसते. ते सत्तरीच्या घरात आहेत. तरीही निवृत्त होण्याची त्याची इच्छा नाही सरचिटणीसपदावर त्याची पुन. निवड झाली पोलिटब्यूरो आणि मध्यवर्ती समितीवरील बहुसंख्य सभासद जुनेच कायम आहेत. याचा अर्थ ब्रेझनेव्हनंतरही त्याचीच धोरणे पुढे चालू राहणार आहेत. दुसरी दिसून आलेली गोष्ट म्हणजे पाश्चात्य लोकशाही देशातील नेत्याप्रमाणेच कम्युनिस्ट नेतेही शेवटपर्यंत अधिकारपद सोडायला तयार नसतात. त्यांनी नवा पायंडा का पाडू नये? आपण नेतेपदी नसू तर पक्ष चुकीच्या मार्गाने जाईल अशी त्यांना भीती वाटते काय? क्रातीचे प्रतिक्रातीत रूपांतर होऊ नये यासाठी सतत जागरूक रहायला हवे हे खरे; पण क्रांतीस त्रेसष्ट वर्षे झाल्यानंतरही हा विश्वास येत नसेल तर कम्युनिस्ट चळवळीच्या कार्यपद्धतीत काही तरी चुकत आहे असे म्हणावे लागेल.

ब्रेझनेव्ह यानी आपल्या भाषणात शिखर-परिषदेची सूचना केली. अमेरिकेचे अध्यक्ष रेगन यानी सूचना पूर्णपणे फेटाळली नाही. पण काही अटी घातल्या. एल साल्वाडोर-मधील बडखोराना क्यूबामार्फत मिळणारी मदत थाबली पाहिजे ही त्यापैकी एक मागणी होती. ब्रेझनेव्ह याच्या सूचनेचा एक उद्देश अमेरिका आणि त्याचे युरोपातील देश याच्यात फूट पाडणे हा असावा असे काही पाश्चात्य निरीक्षकाना वाटते. अफगाणिस्तानात रशियाने लष्करी हस्तक्षेप केल्यापासून अमेरिका व रशिया याच्यातील तणाव शिथिलतेचा कालखंड संपून पुनः तणाव व संघर्षाचा काळ सुरू झालेला आहे. अफगाण बडखोराना शस्त्रे पुरविण्याचे कार्टर याचे धोरण नवे अध्यक्ष रेगन यानी पुढे चालू ठेवले आहे. एवढेच नव्हे तर ही मदत ते वाढवीत आहेत. पाकिस्तानला अमेरिकेने लष्करी मदत वाढवावी व त्याचा खर्च अरब राष्ट्रांनी द्यावा अशी योजना घाटत आहे. इराणी आखातावर प्रभुत्व मिळविण्याचा रशिया प्रयत्न करील अशी धास्ती अमेरिकेस वाटते व त्याला रोखण्यासाठी आपला आरमारी काफिला अल्पसूचनेने इराणी आखाताकडे नेता यावा अशा योजना अमेरिका आखीत आहे. व्हिएटनाम युद्धात ज्या अजस्त्र विमानांचा वापर अमेरिकेने केला होता ती डिएगोगार्शियाच्या तळावर ठेवता यावीत यासाठी तेथील धावपट्टी रुंद करण्यात येत आहे. अमेरिकेची ही तयारी लक्षात घेता शिखरपरिषदेस रेगन तयार होतील असे वाटत नाही; पण पश्चिम युरोपातील अमेरिकेच्या दोस्ताना तणाव-शिथिलता हवी आहे. अफगाणिस्तानचा प्रश्न स्वतंत्रपणे वेगळ्या पातळीवर सोडवावा. पश्चिम आणि पूर्व युरोपातील तणाव-शिथिलतेचे संबध त्यासाठी बिघडावेत हे त्यांना योग्य वाटत नाही. तेव्हा अमेरिकेच्या लष्करी योजनात पश्चिम युरोपची राष्ट्रे फारशी सहभागी होण्याची शक्यता नाही. त्याऐवजी ब्रेझनेव्ह याची शिखरपरिषदेची सूचना मान्य करून तणाव कमी करावा अशी भूमिका ते घेण्याचा संभव आहे.

अफगाणिस्तानात रशियाने लष्करी हस्त-क्षेप करताच ब्रेझनेव्ह आणि कार्टर याच्यात झालेल्या सॉल्ट करारास मान्यता देण्याचे अमेरिकन काँग्रेसने लाबणीवर टाकले संहारक अण्वस्त्राची निर्मिती व वापर यावर मर्यादा घालण्यासंबंधी हा करार होता. या करारात काही दुरुस्त्या करणे आवश्यक वाटत असेल तर त्याला रशियाची तयारी आहे असे ब्रेझनेव्ह यानी सांगितले. पाश्चत्य राष्ट्रानी आपल्या फौजा आखात भागापासून दूर ठेवाव्या, अशा सूचना त्यानी केल्या; पण अफगाणिस्तानातून आपल्या फौजा काढून घेण्याची मात्र रशियाची तयारी नाही. अमेरिकन विरोधकांच्या अदाजाप्रमाणे युरोपात आज रशिया लष्करीदृष्ट्या पाश्चात्य राष्ट्राना वरचढ आहे. ब्रेझनेव्ह याच्या सोळा वर्षांच्या कारकीर्दीत रशियाने आपल्या लष्करी खर्चात दरवर्षी साडेतीन टक्के वाढ केली. सॉल्ट करारानुसार अमेरिकेच्या अण्वस्त्रनिर्मितीत जी कपात झाली त्यामुळे युरोपात अमेरिकेचा या क्षेत्रातील वरचढपणा संपला आणि अण्वस्त्रे सोडून इतर शस्त्राच्याबाबतीत रशियाने पश्चिम युरोपवर आघाडी मिळविली. इराणी आखातभागासह दक्षिण आशियातही रशिया लष्करीदृष्ट्या पाश्चात्यांना वरचढ आहे. पश्चिम युरोपला ६० टक्के तेल आखात-भागातून घ्यावे लागते. पश्चिम युरोपवर यशस्वी आक्रमण करण्याइतके आज रशियाचे लष्करी बळ आहे हे लक्षात घेऊन पाश्चत्य राष्ट्रांनी आपल्याशी सहकार्य करावे असे अमेरिकेस वाटते. शस्त्रकपातीच्या वाटा-घाटीना तयार होण्यापूर्वी आपले बळ रशियाच्या वरचढ निदान रशियाएवढे तरी असले पाहिजे असा अमेरिकेचा प्रयत्न राहील. हे धोरण लक्षात घेता शस्त्रस्पर्धा कमी होण्याऐवजी वाढण्याचाच संभव अधिक दिसतो.

अंतर्गत बाबतीत रशियापुढे प्रश्न आहे विकासाच्या मंदावलेल्या वेगाचा. अमेरिकेला विकासस्पर्धेत आम्ही वीस वर्षांत मागे टाकू अशी भाषा क्रुश्चेव्ह १९६१ मधील चोविसाव्या काँग्रेसमध्ये बोलले होते; पण ही शर्यत रशिया जिंकू शकलेला नाही. उलट तेथील विकासाचा वेग मंदावला आहे. आपल्या नियोजनात उधळपट्टीचे उच्चाटन केले पाहिजे, काटकसर केली पाहिजे असे ब्रेझनेव्ह यानी सागितले; पण यापलीकडे त्यानाही उपाय सापडलेला नाही गेल्या पंचवार्षिक योजनेपेक्षा नव्या पंचवार्षिक योजनेत उत्पादनवाढीचा वेग कमी ठेवलेला आहे. रशियन कामगाराची उत्पादकता अमेरिकन कामगाराच्या तुलनेने कमी आहे. शेती उत्पादनवाढीतही रशियाला फारसे यश आलेले नसून अमेरिकेकडून धान्य आयात करावी लागते. विकासाचा वेग का मंदावला याचे सखोल आत्मनिरीक्षण करून उपाय-योजना करायला हवी. विकास मदावत असेल तर समाजवादी अर्थव्यवस्था भांडवलशाहीपेक्षा प्रगत आहे हे कशाच्या आधारावर मानावयाचे असा प्रश्न चिकित्सक मनाला पडतो.

समाजवाद हा भांडवलशाहीच्या पुढचा विकासटप्पा आहे, याबद्दल तत्वतः वाद नाही. पण कठोर आत्मनिरीक्षण करून आपल्या चुका, उणीवा दूर करायला हव्यात. त्याकडे कोणी लक्ष वेधल्यास त्याला 'प्रति-क्रांतिकारक' म्हटल्याने प्रश्न सुटणार नाहीत. स्वास्थ्य व स्थैर्य आल्याने विकास मंदावला, या टीकेतही काही तथ्यांश आहे काय हे शोधण्यासाठीही प्रामाणिक आत्मनिरीक्षण कम्युनिस्टानी करायला हवे. □

## गुजराथच्या मेडिकल विद्यार्थ्यांचे आंदोलन

# माझ्या डायरीतील काही पाने

दादुमिया

### पंधरा जानेवारी १९८१

'दलिताचे राजकारण' या पुस्तकाच्या लेखकाने मोरारजीभाईंशी नुकतीच दलितांवरील अत्याचाराविषयी चर्चा केली होती. गेली दोन हजार वर्षे दलितानी खूप भोगले आहे, सोसले आहे, आपण त्याना जाणूनबुजून मागे ठेवले आहे, त्याचे प्रायश्चित्त आता भोगले पाहिजे, समाजात समतुला ठेवण्यासाठी हा त्याग केला पाहिजे वगैरे बऱ्याच गोष्टी त्यानी मला सुनावल्या.

त्याआधी थोडे दिवस जीवन कुलकर्णी हे ओकाचे चेले बडोद्यास आले होते. समानता झूट आहे, दलित त्याच्या कर्तृत्वाने दलित आहेत, त्याना सवलती कसल्या देता, त्यांना त्यांच्या जागेवरच नेमले पाहिजे, ते अलीकडे फार शेफारले आहेत, त्यांच्यावर आपण अन्याय केला आहे हा प्रचार मुळातूनच खोटा आहे, तो ब्रिटिशाच्या 'तोडा व राज्य करा' या नीतीचा भाग होता, कांग्रेसने तो वारसा पुढे चालविला, मजजवळ हे सर्व पुरावे आता गोळा झाले आहेत; पण हा प्रचार इतका प्रभावी आहे की माझे म्हणणे लोकांना वेडेपणाचे व अतिरेकी वाटते, माझे कोणी ऐकून घेण्यास तयार नाही किंवा माझे लेख छापण्यास कोणी संपादक तयार नाहीत. आता मी या कर्मगतीला काय करू? वगैरे बऱ्याच गोष्टी विस्ताराने त्यानी मला सांगितल्या. माझे म्हणणे मी आकड्यानिशी सिद्ध करावयास तयार आहे असेही त्यानी आव्हान दिले.

आणि महिन्याच्या आतच त्याचे एकूणएक मुद्दे गुजराथमध्ये सर्व पेपरात ठळकपणे छापून येऊ लागले. जणू त्यांनीच ते लिहिले होते! केवळ पेपरातच नाही तर पुस्तिका, पत्रिका यांच्या द्वारादेखील त्या मुद्द्यांचा प्रसार होत होता. 'दलिताचे राजकारण' या पुस्तकाच्या लेखकास तो सर्व प्रकार पाहून कसेसेच वाटत होते या पोराना, ज्युनिअर डॉक्टरांना दलितांची बाजू समजावून सांगावी असे वाटत होते; पण ही पोरे काहीही ऐकण्याच्या मन स्थितीत नव्हती. आमच्यावर अन्याय होत आहे, तो दूर झाला पाहिजे, एवढीच त्याची मागणी होती.

### अठ्ठावीस डिसेंबर १९८०

आज रविवार. बरोडा मेडिकल युनियन हॉलमध्ये आज 'गेल्या दशकातील वैद्यकशास्त्र' या विषयावर परिसंवाद आहे. त्यात मी बोललो. स्लाईड शो लोकाना फार आवडला.

घरी बारा वाजता आलो. पेपर्स चाळले. इराणचे भिजत पडलेले घोंगडे, आसामातील गोळीबार, भाजपमधील 'समाजवाद' शब्दावरील मारामारी, अतुले याची भाजपची शोभायात्रा अगदीच भिकार झाली, ही घोषणा— मी पेपर्स बाजूला ठेवतो.

एवढ्यात कर्सनदास येतो हा दलित कार्यकर्ता. पेपरात स्टेटमेंट्स् देण्यात पटाईत. स्वत बरोबर इतराना ओढणारा. मी त्यास 'पेपर टायगर' म्हणतो.

आमचा एक क्लब आहे. त्याचे आम्ही लाइफमेंबर्स आहोत. काही विशेष घटना घडली की त्याची प्रतिक्रिया म्हणून आमचे प्रेसमध्ये स्टेटमेंट आलेच पाहिजे. विशेष जागृत नागरिक म्हणा; हवे तर!

मला ह्या स्टेटमेंटबाजीचा हव्यास नाही. पेपरात नाव येण्याचाही सोस नाही इंग्रजी–हिंदी–मराठी लेख माझे येत असतातच; पण मित्राना नाही कसे म्हणायचे? सहीच पाहिजे ना माझी, घ्या!

कित्येक वेळा तर टेलिफोनवरच संमती घेतात एकमेकाची. आता यातून सुटणे अवघड आहे आदतसे मजबूर है.

कर्सनदास सुनावतो, 'तुम्हाला काहीच वाटत नाही? अहमदाबादेपासून २५ किलोमीटर्सवर जेतलपूर गावी एका हरिजन तरुणास जिवंत जाळण्यात येते आणि तुम्ही स्वस्थ कसे?'

मी खिशातून पेन काढतो व म्हणतो, 'कर्सनदास. कुठे सही करू ते बोला—'

कर्सनदासाचा चेहरा उतरतो. तो म्हणतो, 'तुम्ही सवर्ण, ब्राह्मण, करा, तुम्ही थट्टा करा आमची. आम्हाला जिवंत जाळा! पूर्वी जनता राज्यात हरिजनाची हालत गंभीर होती. आता इंदिरा मा आली, तरी आम्ही आपले पददलितच. दुर्दैव आमचे!'

'मी काय करू ते सांग!'

'तुम्ही काय किंवा मी काय— काय करणार आपण? हा मानवनिर्मित भेद आहे, जुना आहे, आम्ही गरीब आहोत, अडाणी आहोत, असंघटित आहोत, आमच्यातच किती तरी भेद आहेत, यामुळे दुर्बळ आहोत, त्याच्या उलट तुमची गोष्ट. श्रीमंत, सशक्त व सुशिक्षित आमची संख्या मोठी दिसत असेल, पण आम्हाला इंदिरा काग्रेसशिवाय कोणी वाली नाही आणि बिचारी इंदिरा प्रत्येक खेडेगावी कोठे पहायला जाणार?'

अरे, कर्सनदास, तुला झालं काय आज एवढे उदास व्हायला?'

'आम्ही शहरात आहोत, म्हणून खूप सुखी आहोत. नोकऱ्या मिळतात, प्रमोशन मिळते, शिक्षणात सवलती मिळतात, खेड्यात आम्हाला दडपून टाकले जाते. फार वाईट परिस्थिती आहे आमची, गुलामच म्हणा ना!'

'शिक्षणाचा प्रसार झाला की ही दुर्दैवी गुलामगिरी आपोआप दूर होईल!'

'तेच नेमके होत नाही!'

'का सरकार तर खूप सवलती देते ना?'

'होय, पण त्यामुळेच आमची मुले शिकत नाहीत, शिकू नका म्हटलं तर ती जिद्दीने शिकतील, शिका म्हटल तर कोणी शिकत नाही. हरिजनाच्या मुलाने शिकून काय करायचं आहे? असंच जो तो विचारतो.'

'पण तुमचे नेते–'

त्यांना त्यांच्या खुर्चीची चिंता आहे. समाजाची ओढ थोडीच आहे त्यांना? आम्ही गरीब राहिलो, अडाणी राहिलो तरच त्यांचे पुढारीपण चालू राहील ना? ते कशाला आमची काळजी करतील?'

'वाईट आहे.'

'राजकारण आहे, हे असेच चालायचं. त्याला इलाज काही नाही!'

## वीस जानेवारी

सवर्ण विद्यार्थ्यांच्या सभेत गेलो. भलतीच गरम दिसताहेत ही मुले. त्यांना सामाजिक जागृती कितपत आहे त्याचा संशय वाटतो. फक्त स्वार्थ दिसतो; पण असे म्हटल्यावर काय भडकली माझ्यावर!

'वीस जानेवारीचा संप आम्ही डॉक्टरानी का सुरू केला, माहीत आहे?' त्याच्या म्होरक्याने विचारले, 'आता आमच्यावरील अन्याय आम्हाला सहन होत नाही, हद्द झाली!'

'दलितानी गेली दोन हजार वर्षे असा अन्याय सहन केला आहे.'

'तो आमच्या पूर्वजानी केला असेल. त्याची शिक्षा आम्हाला का?'

'कारण तुमच्या पूर्वजानी ही शिक्षा ह्या दलिताना केली होती. ती शिक्षा आज देखील हे दलित भोगत आहेत.'

'शिक्षा का सवलती?'

'शिक्षा–'

'त्याना त्याची लायकी नसताना मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळतो. आम्हाला वर्षभर मरमर मरावे लागते. ऐंशी टक्क्यावर गुण मिळवावे लागतात आणि ह्यांना तर चाळीस-पंचेचाळीस टक्क्याना मेडिकल कॉलेजात प्रवेश मिळतो. हा अन्याय आहे. तो आम्ही किती दिवस सहन करायचा? हां, यांची लायकी असेल तर आम्ही तो जरूर सहन करू!'

'पण ह्या पांगळ्या मुलाना सपोर्टसाठी काठी वा पांगुळगाडा दिला तर काय हरकत आहे?'

'त्याना अंगणात चालवा ना, उगाच हायवेवर मरायला त्यांना का आणता? ते तर घायाळ होतातच व इतरांना गोत्यात आणतात!'

'हे म्हणणे अतिशयोक्तीचे आहे.'

'जराही नाही!'

'कशावरून?'

'एम. बी. बी. एस ची परीक्षा ते चार-पाच ट्रायलनंतर पास होतात. काही जणाना तर दहा-दहा ट्रायल्स् लागतात. मग त्यांना एम. डी. किंवा एम. एस. हे स्पेशॅलिस्ट पदव्युत्तर कोर्स घेण्याची बुद्धी सुचते. का तर तेथे देखील त्याना राखीव जागा मिळतात. एम. बी बी एस. ला ठीक आहे.'

'का?'

'कारण हे एम. डी. वा एम् एस. झालेले बी. सी. डॉक्टर्स लोकाच्या प्राणाशी खेळतात. त्याना काही येत नाही!'

'मग पास कसे होतात?'

'जसे त्यांना एम. बी. बी. एस. च्या परीक्षेत धक्का मारून पास केले जाते तसे एम. डी. किंवा एम. एस. ला देखील पास केले जाते!'

'मला पटत नाही!'

'कारण ती झळ तुम्हाला लागलेली नाही. आमच्यामधल्या उत्कृष्ट मुलांना या बी. सी. मुलामुळे मेडिसिन किंवा सर्जरीला जागा मिळत नाही, हुषार असून एम. डी. किंवा एम. एस. व्हायला संधी प्राप्त होत नाही!'

'एवढ्या जागा आहेत ना?'

'आहेत कुठे जागा? पूर्वी आम्हाला त्याची पर्वा नव्हती. चटकन् अमेरिकेत जॉब मिळे. तेथे पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री व डिप्लोमादेखील मिळे. अमेरिकेने आता साऱ्याना येऊ न देण्याचा कायदा केला आहे. नाही तर कोण या हिंदुस्थानात राहील? दहा पट चागला पगार व वीस पट जास्त सुखसोयी मिळतात!'

'कल्पना आहे, माझे अमेरिकेत खूप डॉक्टरमित्र आहेत आणि प्रत्येक जण लखोपती झाला आहे!'

'आता चित्र बदलले आहे'

'अच्छा, म्हणजे या आदोलनाचे मूळ कारण कार्टर किंवा रीगन आहे तर!'

त्यामुळे हा प्रश्न यापूर्वी उपस्थित झाला नाही. मध्यंतरीच्या काळात या बी. सी. मुलाना सरकारने सर्व सवलती देऊन टाकल्या. स्कॉलरशिप्स्, फुकट पुस्तके, फुकट हॉस्टेलमध्ये राहणे व जेवणे, स्टेशनरी वगैरे सवलती आणि एम. डी. वा एम. एस. साठी इतर लायक मुलाना डावलून प्रवेश! खास न्याय आहे!'

'पण ती मागासलेली मुले नाहीत?'

'चागले एम. बी. बी. एस. झालेले, एम. बी. बी. एस. चा पगार मिळविणारे, इतरांप्रमाणे सामाजिक स्थान असलेले– आणि तुम्ही त्याना मागासलेले म्हणता?' तो म्होरक्या भडकून गेला होता.

'पण एक लक्षात ठेवा, हे दलित डॉक्टर्स खेडेगावी जातात ग्रामीण लोकाची सेवा करतात.'

'हे झूट आहे. बकवास आहे. ज्याना ग्रामीण लोकाची सेवा करावयाची आहे असेच लोक ग्रामीण भागात जातात. बहुसंख्य डॉक्टर्स

गावात पैसा कमावण्यासाठी जातात. जे शहरात टिकत नाहीत ते खेडेगावी पळतात आणि दलित डॉक्टर्स एम. डी. किंवा एम. एस. झाल्यावर शहरातच रहातात. कारण, सरकार तशी त्याना सवलत देते. नोकऱ्यात त्यांना प्रथम पसत करतात, लायकी असो वा नसो! आमचा झगडा या लायक नसलेल्याविरुद्ध आहे. समता पाहिजे ना सर्वत्र, ही तर चक्क असमानता आहे. हा अन्याय आहे!'

---

## बावीस जानेवारी

---

१९७६ साली मी 'दलिताचे राजकारण' नावाचे पुस्तक लिहिले. मॅजेस्टिकने ते प्रसिद्ध केले लवकरच सवर्ण व दलित याच्यात संघर्ष होईल, असे त्यात मी भाकीत केले होते.

मराठवाड्याच्या नामांतरप्रकरणाच्या वेळी मला माझ्या भाविताचा चागला पडताळा आला. जनता राज्यात 'दलितावर अत्याचार' हा सतत प्रचार चालू होता व तो आजही चालूच आहे, गुजराथमध्ये मेडिकल विद्यार्थ्यांच्या आदोलनामुळे त्यास पुन्हा तोड फुटले.

माझा मुलगा मेडिकल कॉलेजच्या दुसऱ्या वर्गात शिकतो, उत्साही व हुशार कार्यकर्ता आहे; पण या आदोलनावरून तो व मी विरुद्ध गटात जणू उभे आहेत! जणू बाहेरच्या वर्णविग्रहाचे रूपातर आमच्या घरी गृहविग्रहात झाले आहे. मुलाच्या आईची मोठी चमत्कारिक परिस्थिती झाली आहे दोन्ही बाजू बरोबर आहेत असे तिला आलटून-पालटून वाटते.

---

## तेवीस जानेवारी

---

दीपक माझ्या मुलाचा मित्र. खूप हुशार व स्मार्ट आणि खट्याळ व मिस्कील!

'या बी. सी. डॉक्टराना पंतप्रधान, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळे याना ट्रीट करण्यासाठी ठेवले पाहिजेत!' दीपक मला सुनावतो.

'म्हणजे काय होईल?' मी विचारतो.

'दरवर्षी नवीन पंतप्रधान व नवीन मुख्यमंत्री मिळेल. अशी ट्रीटमेंट मिळेल की सारे व्ही. आय. पी. आडवे!'

'ही तुझी विकृत दृष्टी आहे.'

'नाही, तुम्हास हे पटणार नाही. त्याचे स्टॅंडर्ड फार पुअर आहे. त्यांना काही येत नाही!'

'असे कसे होईल? तीच पुस्तके, तेच ज्ञान, तेच शिक्षक–'

'पण त्याना इतक्या सवलती सरकारने देऊन ठेवल्या आहेत की ही हरिजन मुले अभ्यासच करीत नाहीत. आमच्याकडे नाहीत एवढी पुस्तके त्याच्या एकेकाकडे असतात; पण ती फुकट मिळाल्यामुळे त्याना त्यांची किंमत वाटत नाही फुकट वह्या, फुकट स्टेशनरी, फुकट स्कॉलरशिपा. काही जण तर पैसे घरी पाठवितात!'

'मला नाही पटत.'

'कारण तुम्ही त्यांच्याबरोबर रहात नाही. तुमचे ज्ञान पेपरातून येते. आम्ही त्याच्याबरोबर रहातो, वाचतो, शिकतो. आम्ही त्याना चोवीस तास बघतो. त्याची शैक्षणिक पातळी आम्ही जास्त ओळखतो.'

'एखाद-दुसरा मुलगा असा असेल, सर्व मुले अशी असणे शक्यच नाही!'

'आमच्या कॉलेजात येऊन पहा. त्यांना न्यूनगंड आहे.'

'तो तुम्ही दूर केला पाहिजे!'

'अं हं, तो दूर होणे शक्य नाही. त्याना काहीच येत नाही, हे हे ते जाणतात. आपण सरकारचे जावई आहोत हे देखील ते जाणतात. म्हणून त्याच्यात विकृत न्यूनगंड शिरला आहे. ते अलग रहातात. आम्ही प्रयत्न केला तरी ते आमच्यात मिसळत नाहीत!'

'तुम्ही त्याना सुधारण्याचा प्रयत्न करा ना!'

---

## पंचवीस जानेवारी

---

काल ऑल इंडिया एक्सरेवाल्याची कॉन्फरन्स होती. कोकिला व्यास ह्या मंत्री तिचे उद्घाटन करणार होत्या; पण एवढ्या घाबरल्या की उद्घाटनासाठी आल्याच नाहीत! मुलांनी 'काळे झेंडे दाखवू!' असे बाईंना जाहीर आव्हान दिले होते.

सवर्ण व अवर्ण मुलाचे मोर्चे समोरासमोर काल अहमदाबादेत आले व त्यातून मोठा दगा झाला. बी. जे. मेडिकल कॉलेजात कसे तग वातावरण होते. कास्टवॉर बहुधा यातून निर्माण होणार अशी भीती कर्सनदासने टेलिफोनवरून व्यक्त केली. 'या सरकारचे काही सागू नकोस, हा दंगा त्यांनीच करविला असू शकेल!' मी म्हणालो, 'मेडिकलच्या विद्यार्थ्यांचे हे आंदोलन शाततापूर्ण चालले आहे हे सरकारला बघवत नाही. दंगा झाला की ते निमित्त करून सरकारला नाक खुपसायला संधी मिळेल ना!' कर्सनदासला माझा दृष्टिकोण पसंत नाही. 'तुम्ही सवर्ण म्हणजे विकृत दृष्टीतूनच पहाणार!' असे तो म्हणाला.

हे आदोलन आता जास्त उग्र होत जाणार असे दिसते. व्ही. एस हॉस्पिटल, शारदाबेन हॉस्पिटल, आय. जी. हॉस्पिटल व नागरी आय हॉस्पिटल येथील रेसिडेंट-डॉक्टर्स परवापासून संपावर जाणार आहेत!

अ. भा. दीनबंधु कॉंग्रेसवाल्यानी एक जाहीर पत्रक काढले आहे, आमच्या हरिजन बंधूवर सवर्णांनी खुनी हल्ला चढविला आहे, पोलिसानी त्यांना संरक्षण द्यायला हवे वगैरे बरेच काही त्या पत्रकात आहे. म्हणजे कास्टवॉर हो वा न हो, पण हे 'स्टेटमेंटवॉर' आता चालू झाले आहे.

मला सुदैवाने रोटरी क्लबच्या वापी येथील डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्सला जावे लागेल पुढील महिन्यात. मी बहुधा या स्टेटमेंटमधून सुटेन फुकट शाईचा व कागदाचा नाश!

बडोदा व जामनगर येथेही डॉक्टरमंडळींनी संप पुकारला आहे. या तिन्ही ठिकाणी मिळून २५०० मेडिकलचे विद्यार्थी व ४००

पृष्ठ २० वर

अवती भवती । शरद कृष्णन्

# □ अंदाजपत्रक : कोंडी फोडण्यात अयशस्वी

फेब्रुवारी महिना आला की ससदेचे अंदाजपत्रकी अधिवेशन सुरू होते. अर्थमंत्री नवीन वर्षामध्ये काय टोलेबाजी करणार याचे अदाज बाधले जाऊ लागतात. महागाईने खचलेली जनता नवीन रट्टा बसणार हे गृहीत धरून चाललेली असते. फक्त फटका कुठे बसणार आणि किती जोराचा बसणार हे निश्चित माहीत नसल्याने चाचपणी सुरू असते व्यापारीमंडळी याचाही फायदा घेतात आणि अंदाजपत्रक माडले जाण्यापूर्वी खरेदी करा असा नारा लगवत त्रस्त जनतेला आणखीनच बेचैन करून सोडतात. अंदाजपत्रकापूर्वीच्या या वातावरणाला लोक आता तसे सरावलेले असले तरी अर्थमंत्री नेमकी काय किमया करतात यावर लोकाचे तसे लक्ष असतेच आणि म्हणूनच प्रथम रेल्वेचे आणि त्यापाठोपाठ अर्थमंत्र्याचे नववर्षाचे अंदाज पत्रक प्रसिद्ध झाले की, लगोलग प्रतिक्रिया व्यक्त होतात. पेट्रोलियम पदार्थांच्या किंमती अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वीच वाढवून ठेवल्या असल्याने या स्फोटक विषयाला अंदाजपत्रकात हात घातला जाण्याचा सभव नव्हताच. रेल्वेखात्याच्या अंदाजपत्रकाने भाडेवाढीचा तडाखा दिला. पासहोल्डर्सना हात लावला तर फार बोबाबोब होते. मधु दडवते याच्यासारखा जनता सरकारच्या जमान्यामधील लोकप्रिय मंत्रीही, रेल्वेपासदरामध्ये सपाटून वाढ केल्याने होरपळून निघाला होता. त्यामुळे पासधारकाच्या वाटेला जाण्याऐवजी रेल्वेमंत्र्यानी सर्वसाधारण प्रवाशाच्या डोक्यावर भाडेवाढ लादली. रेल्वेच्या अदाजपत्रकाचा येथे विचार करायचा नसल्याने त्याच्या तपशीलात जात नाही. अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकापूर्वी रेल्वेभाडी वाढवून, या खात्याने भाडेवाढीचा पहिला तडाखा दिला होता, याची नोद करणे अगत्याचे वाटते. देशाची आर्थिक परिस्थिती, वाढत्या लोकसंख्येमुळे नियोजनाचा होत असलेला बट्ट्याबोळ आणि आतरराष्ट्रीय परिस्थितीचे आर्थिक क्षेत्रामधील दडपण यामुळे कोणताही अर्थमंत्री चमत्कार करू शकत नाही, याची जाणीव सर्वांनाच आहे. या बिकट परिस्थितीतून वाट काढण्याचा अर्थमंत्री कसा प्रयत्न करतात याचे प्रतिबिंब अंदाजपत्रकात पहावयास मिळते. त्या दृष्टीने केंद्रीय अर्थमंत्री व्यंकट रामन यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकाचे 'निराशाजनक अंदाजपत्रक' असेच वर्णन करावे लागेल.

अदाजपत्रक सादर झाले त्याच दिवशी दूरदर्शनवर एक चर्चासत्र पेश करण्यात आले. प्रा. गंगाधर गाडगीळ यानी त्या चर्चासत्राचे आयोजन केले होते भाग घेणारी मंडळी आर्थिक क्षेत्रामधील जाणकार असली तरी अंदाजपत्रक सादर झाल्यापासून काही तासातच ही चर्चा होत असल्याने केवळ पहिली प्रतिक्रिया असेच या चर्चेचे स्वरूप असते. या चर्चेत भाग घेणाऱ्या श्रीमती शरयू दप्तरी यांनी 'ब्लँक-बजेट' अशा शब्दात, या अंदाजपत्रकाचे जे वर्णन केले ते योग्य वाटते. भेडसावणाऱ्या आर्थिक प्रश्नाची कोंडी फोडण्यापेक्षा थातुर-मातुर उपाय योजून, आहे तेच, खटले कसेबसे चालू ठेवणारे हे अंदाजपत्रक तसे जैसे थे वादी वाटते.

चार आकडी मासिक प्राप्ती ही एका जमान्यात कौतुकाची बाब होती; परतु रुपयाची क्रयशक्ती प्रतिवर्षी अशी झपाट्याने, घसरत चालली आहे की, हजार रुपये महिना आणणाऱ्या माणसाचे पाकीटही पधरा दिवसांतच हलके होऊ लागते. गेल्या दोन वर्षांत महागाईमध्ये ४० टक्कानी वाढ झाली असून रुपयाची किंमत २५ पैशावर येऊन ठेपली आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या दोन-तीन वर्षांत आयकरामध्ये थोड्या-फार सवलती दिल्या होत्या. व्यंकट रामन यांचे याबाबतचे धोरण अधिक उदार असल्याची प्रचीती अदाजपत्रकाने दिली. सुमारे १४०० ते १४५० पर्यंत ज्यांचे मासिक उत्पन्न आहे अशी मडळीही त्यानी आयकरयोजनेपासून लांब ठेवून रुपयाची क्रयशक्ती किती घसरली आहे याची जाणीव असल्याची कबुली दिली आहे. छोट्या करदात्यांकडून कर वसूल करण्यात जी शक्ती आणि वेळ वाया जात होता त्याचा अधिक चांगल्या प्रकारे उपयोग केला तर आयकरखात्याला किमान वीस लाख नवीन करदाते मिळू शकतील असा एक अंदाज आहे. अर्थात कर चुकवणाऱ्या या मंडळीना जाळ्यात ओढायचे म्हणजे युद्धपातळीवर हालचाली करणे जरूर आहे. आयकरामध्ये ज्या सवलती दिल्या आहेत त्यामुळे नोकरपेशा मंडळीना निश्चित दिलासा दिला आहे. रस्तोरस्ती लोकाना थाबवून दूरदर्शनचे वार्ताहर ज्या प्रतिक्रिया घेतात, त्या सर्वसामान्य जनतेच्या प्रतिक्रियामधून, आयकराबाबत अर्थमंत्र्यानी ज्या सवलती दिल्या आहेत, त्यांचा आवर्जून उल्लेख होता.

औद्योगिक आघाडीवर परिस्थिती फारशी आशादायी असल्याचे दिसत नाही. वीजउत्पादनक्षमतेपेक्षा प्रत्यक्ष उत्पादन ५० टक्क्यांहून कमी आहे. कोळशाचे उत्पादनही समाधानकारक नसून मालवाहतुकीची परिस्थितीही निराशजनक आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये काम करावे लागत असल्याने औद्योगिक आघाडीवरील परिस्थिती समाधानकारक नाही. औद्योगिक उत्पादनास चालना मिळावी म्हणून गेल्या काही वर्षांत सवलती दिल्या गेल्या तरी त्याचे अपेक्षित परिणाम दिसून आले नाहीत ३०० हून जास्त मोठे, कारखाने आणि सुमारे वीस हजार मध्यम प्रतीची उत्पादनकेंद्रे विविध कारणामुळे उत्पादनक्षमतेच्या ५ टक्क्याहून जास्त उत्पादन करू शकत नाहीत. वाढत्या महागाईमुळे कामगारक्षेत्रात कमालीची अवस्थता असून, त्याचा परिणामही उत्पादनावर होतो. तरीही अर्थमंत्र्यांनी चालू वर्षी आयातधोरणावर ज्या सवलती दिल्या आहेत, त्याचा थोडाफार लाभ मिळू शकेल.

राष्ट्रीय उत्पादनात आणि दरडोई उत्पादनात झालेली घट ही चिंतेची बाब आहे. १९७०-७१ च्या किमती पायाभूत मानल्या तर १९७९-८० मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात ५ टक्के आणि दरडोई उत्पन्नात ६.८ टक्के घट झाल्याचे दिसते. गेल्या तेरा वर्षांमधील ही सर्वांत मोठी घट मानावी लागेल. ९७,५०० कोटी रुपयाच्या सहाव्या योजनेच्या पहिल्या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करताना अर्थमंत्र्याना अडचणीच्या परिस्थितीमधून जावे लागले हे मान्य केले तरी महा-

गाईचे वाढते प्रमाण आवाक्यात ठेवण्याच्या दृष्टीने फार मोठे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. पेट्रोलियम पदार्थांच्या वाढलेल्या किमती, स्टील, औषधे, कोळसा, रेल्वेभाडी व मालवाहतूक याची झालेली दरवाढ आयकरामधील सवलतीमुळे जे मिळाले त्याची वजावट करण्याला पुरेशी आहे. १८१० कोटी रुपयांची तूट दाखवणारे हे अंदाजपत्रक साकल्याने विचार केल्यावर आर्थिक क्षेत्रामधील अधिकारी मंडळींनाही समाधानकारक वाटत नाही.

वृत्तपत्राच्या किमती आताच जाणवण्याइतक्या भडकलेल्या आहेत. वृत्तपत्रीय कागदावर बसवण्यात आलेला वाढीव १५ टक्के कर वृत्तपत्राच्या किमती वाढवण्यास उद्युक्त करणारा आहे. वाचकाला बोजा पडू नये म्हणून कदाचित प्रथम जाहिरातदारावर हा बोजा टाकला जाईल आणि जाहिरातदार हा वाढीव बोजा ग्राहकावर टाकून मोकळे होतील. फोन हे व्यापारी क्षेत्रामधील संपर्काचे महत्त्वाचे माध्यम आहे. त्याच्या दरात झालेली वाढही अप्रत्यक्षरीत्या सर्वसाधारण जनतेच्या माथी येऊन बसणार आहे. नियंत्रित दरामधील कापडाचे उत्पादन वाढावे या हेतूने महागड्या कापडावर ५ टक्के जादा कर लादण्यात आले आहेत. कापडाच्या आधीच वाढलेल्या किमती त्यामुळे जास्त भडकतील असे मत कापडउद्योगामधील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. या करवाढीमुळे उपलब्ध होणारी १०० कोटी रुपयांची रक्कम नियंत्रित दराचे कापडउत्पादनासाठी वापरली जाईल, ही त्यातल्या त्यात दिलासा देणारी बाब आहे.

ग्रामीण भागामधील विद्युतीकरणासाठी आणि पाणीपुरवठा योजनांसाठी मोठ्या रकमा खर्ची पडणार आहेत. दारिद्र्यरेषेखाली असलेल्या किमान ३० लाख लोकांना सहकार्याचा हात देण्यात आला आहे. या विषयावर दूरदर्शनवर बोलताना बहुतेक सर्व तज्ज्ञांनी ज्या पद्धतीने या योजनांची अंमलबजावणी होते त्यावर कडक टीका केली. केवळ रकमा राखून अथवा खर्च करून हा प्रश्न सुटण्यासारखा नाही, तर ज्यांच्यासाठी या रकमा खर्ची पडणे जरूर असते त्यांच्यासाठी त्या खर्च होत नाहीत. फसवी आकडेवारी कागदावर राहते आणि प्रत्यक्षात परिस्थिती अगदी वेगळी असते. ग्रामीण भागामधील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वातावरण असे असते की, श्रीमंत अधिक श्रीमंत होतात आणि गरीब 'गरिबी हटाव'चे नारे ऐकत आहेत तेथेच राहतात.

काळा पैसा संबंधितांनी आपण होऊन घोषित करावा म्हणून जे कर्जरोखे काढण्यात आले त्यामुळे ८०० कोटी रुपये मिळतील अशी अपेक्षा होती; परंतु अपेक्षित रकमेच्या निम्मी रक्कम गोळा होऊ शकली तरी खूप झाले असे वाटण्यासारखी परिस्थिती आहे. काळ्या पैशाचा प्रभाव जबरदस्त आहे. आज असे दिसते की, पन्नास हजार रुपयांच्या वरचा कोणताही व्यवहार हा काळ्या पैशाच्या फुगवट्यात भर टाकतो. कारण अशा व्यवहारातून मोठी रक्कम काळ्या पैशात दिली जाते काळा पैसा हा एकूणच अर्थव्यवस्थेला भेडसावणारा प्रश्न असून एक वेळ अशी येईल की, संपूर्ण चलनव्यवस्था रद्दबातल करण्यासारखा क्रांतिकारी उपाय योजूनच या अक्राळविक्राळ प्रश्नाची सोडवणूक करावी लागेल काळ्या पैशाच्या प्रश्नाचे गांभीर्य शासनाला उमजत नाही असे नव्हे; परंतु थातुरमातुर उपाय करण्यापलीकडे याबाबत फारसे काही केले जात नाही. अंदाजपत्रकामध्ये ८१० कोटी रुपयांची तूट दाखवली असली तरी प्रत्यक्षात ती २,४०० कोटी रुपयांहून जास्त होऊ शकेल, असेच अनेक जाणकार अर्थतज्ज्ञांचे मत आहे. अर्थमंत्र्यांचे हे अंदाजपत्रक करवाढीचा फार मोठा बोजा टाकत नसले तरी तुटीची ,अर्थधारणा ही मोठी चिंतेची बाब आहे. अर्थव्यवस्थेला गती देण्याचे वा आर्थिक क्षेत्रामध्ये शासनाला अभिप्रेत असलेले बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य या अंदाजपत्रकामध्ये नाही उत्पादनवाढीला चालना मिळेल अथवा वाढत्या महागाईला आळा बसेल, असे फार मोठे उपाय या अंदाजपत्रकामध्ये योजले नसल्याने वर्षभर पुढे जाण्यापेक्षा अर्थमंत्री जास्त काही करत नाहीत. म्हणूनच एक 'निराशाजनक अंदाजपत्रक' असेच या अंदाजपत्रकाचे वर्णन करावे लागेल. ◘

# विजय मर्चंट—एक दिलखुलास माणूस !!

क्रिकेट-शौकिनांना विजय मर्चंट हे नाव नवीन नाही. आपल्या जमान्यामध्ये ते प्रथम श्रेणीचे खेळाडू समजले जात. त्यानंतरच्या काळात, आकाशवाणीवरून आणि दूरदर्शनवरून ते क्रिकेटचे समालोचन करत असत. झालेल्या खेळावर भाष्य करून काय घडू शकेल याबाबत अंदाज वर्तवण्यासाठी, तज्ज्ञ म्हणूनही त्यांची अनेक वेळा निवड झाली आहे. विजय मर्चंट हे नाव केवळ क्रिकेटशीच निगडित नाही. अनेक सामाजिक संस्थांशी त्यांचा घनिष्ट संबंध आहे. कापडव्यवसायामध्ये अग्रभागी असलेल्या अत्यंत धनवान कुटुंबात जन्म घेऊन आणि क्रिकेटसारखा शाही खेळ खेळूनही विजय मर्चंट आज उतार वयातही ज्या धडाडीने अंधमंडळीच्या कल्याणयोजना राबवल्या जाण्यासाठी कार्य करतात त्याचे कौतुक वाटते.

अलीकडेच रुसी मोदी यांनी एका लेखामध्ये गावस्कर आणि विजय मर्चंट यांची तुलना करून विजय मर्चंट यांचा भारतामधील सर्वोत्कृष्ट आघाडीचा फलंदाज असा गौरव केला. मर्चंट यांना याबाबत प्रतिक्रिया विचारली गेली असता ते म्हणाले, सुनीलबरोबर माझी तुलना केली जाते हा मी माझा गौरव मानतो. माझ्या टेस्ट कारकीर्दीमध्ये मी हजार धावाही केलेल्या नाहीत, तर सुनिलने सहा हजार धावा पूर्ण केल्या असून, तो आणखी चार-पाच वर्षे खेळला तर आठ हजाराहून जास्त धावा करू शकेल असे असूनही निवृत्त होऊन ज्याला अनेक वर्षे झाली आहेत आणि जो हजारभर धावाही करू शकलेला नाही, अशा माझ्यासारख्या खेळाडूबरोबर सुनिलची तुलना होऊ शकते, हीच मुळी माझ्या दृष्टीने गौरवाची बाब आहे.

विजय मर्चंट यांची क्रिकेट-कारकीर्द तशी अल्पकालीन असली तरी जी थोडी वर्षे ते मैदानात होते, त्या काळात त्यांनी मोठे विक्रम रचून दाखवले प्रथम श्रेणीमधील सामन्यातील त्यांची सरासरी ७२ धावांची असून ९५ धावांची सरासरी गाठणाऱ्या डॉन ब्रॅडमनच्या पाठोपाठ विजय मर्चंट यांचे नाव घ्यावे लागते. क्रिकेटमधील आपल्या योग्यतेपेक्षाही आपल्याला जास्त सन्मान मिळाले अशी विजय मर्चंट यांची भावना आहे. क्रिकेटमधील आकडेवारीला ते फारसे महत्त्व देत नाहीत. आकडेवारी वस्तुनिष्ठ तपशील पुरवू शकत नसली तरी क्रिकेटमधील आकडेवारी पुष्कळ काही सांगून

जाते असे त्यांचे मत आहे. स्वतःच्या क्रिकेट कारकीर्दीबद्दल बोलताना वीजय मर्चंट म्हणतात, 'सातत्य आणि इंग्लंडमधील मैदानावर निर्धाराने खेळण्याची वृत्ती, यामुळे मला हे यश मिळू शकले.' जुन्या आठवणीना उजाळा देत ते म्हणाले–१९३६ आणि १९४६ अशा दोन्ही वेळच्या इंग्लंड दौऱ्याच्या वेळी मी उत्तम कामगिरी बजावली. व्यक्तिगत जीवनामधील शिस्त आणि क्रिकेटमध्ये यश मिळावे म्हणून अन्य मोह टाळले, यामुळेच क्रिकेटच्या मैदानावर मी भरीव कामगिरी करू शकलो. अत्यंत श्रीमान कुटुंबात माझा जन्म झाला तरी क्रिकेट हे ध्येय मानल्यावर, मद्यप्राशन, धूम्रपान आणि रात्रीचे जागरण यापासून मी स्वतःला कटाक्षाने दूर ठेवले. उत्तम फलंदाजाचे नेत्र तेज असलेच पाहिजे अशी माझी धारणा असल्याने मी त्या काळात सिनेमा पाहत नसे, असे सांगून मर्चंट म्हणाले, आज क्रिकेटशी माझा कोणताही संबंध नसला तरी वक्तशीरपणाची सवय इतकी अंगवळणी पडली आहे की, आजही मी सिनेमाला जात नाही.

एखादा त्रासदायक निर्णय आवश्यक असेल तर त्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात आलीच पाहिजे अशी आजही विजय मर्चंट यांची धारणा आहे. चहाची त्याना बऱ्यापैकी आवड होती आणि अन्य कोणतेच व्यसन नसल्यामुळे त्यांचा आठ-दहा कप चहा सहज होत असे. पुढे हे प्रमाण वाढून बारा-पंधरा कपापर्यंत गेले. वर्षानुवर्षे हे असेच चालू राहिले. अगदी अलीकडेच त्याचे डॉक्टर दाते यानी त्याना चहा कमी करण्याचा सल्ला दिला. चहा कमी करणे अवघड वाटल्यामुळे विजय मर्चंट यानी चहापान पूर्णपणे सोडून दिले. आता कोणी आले-गेले तर ते येणाऱ्याला चहा देतात आणि स्वतः मात्र गरम पाण्यातून मध घेतात!

## समाजकार्यात जास्त आनंद

'क्रिकेटच्या भाषेत बोलायचे झाले तर माझ्या आयुष्यामधील पहिल्या खेळीची उत्तम वर्षे मी क्रिकेटला दिली आणि क्रिकेट सोडल्यावर जी दुसरी खेळी सुरू झाली त्यामध्ये मी सामाजिक कार्यात ओढला गेलो. विशेषतः अंध लोकांसाठी मी काही करू शकतो यामुळे मी विलक्षण समाधानी आहे. माझे क्रिकेटजीवन आणि सध्याचे माझे जीवन यांची तुलना केली तर माझ्या सध्याच्या जीवनात मी, समाधानी आहे, जास्त आनंदी आहे असे म्हणावे लागेल.'

क्रिकेट कसे सोडले याबाबत बोलताना विजय मर्चंट म्हणतात, 'प्रथम मी खेळ सोडला. नंतर क्रिकेटबद्दल भाष्य करणे सोडले. नंतर निवड-समितीवरून बाजूला झालो आणि आज क्रिकेटशी माझा कोणताही संबंध नाही! गेल्या तीन वर्षांत मी एकही सामना पाहिलेला नसल्याने आज लक्षणीय कामगिरी बजावत असलेल्या संदीप पाटीलची फलंदाजी मी पाहिलेली नाही. क्रिकेटने मला नाव दिले असले तरी आज क्रिकेटशी माझा तसा संबंध नाही. १९३६ साली मी इंग्लंडदौऱ्यावर गेलो होतो तेव्हा एका बुजुर्ग खेळाडूने मला सल्ला दिला की, हवाहवासा वाटत असतानाच तू निवृत्त हो! मला त्या वेळी हा विचार तेवढा रुचला नाही; परंतु अधिक विचार केल्यावर मला त्याचे म्हणणे पटले. क्रिकेटवर माझे विलक्षण प्रेम होते आणि आजही आहे; पण म्हणूनच मी अनेक वेळा अप्रिय निर्णयही घेतले' विजय मर्चंट पुढे म्हणाले, 'ऑस्ट्रेलियाच्या ज्या दौऱ्याचे नेतृत्व लाला अमरनाथने केले त्या दौऱ्यासाठी कर्णधार म्हणून प्रथम माझी निवड झाली होती तथापी माझी तब्येत बरी नव्हती. ऑस्ट्रेलियामध्ये मी जावे आणि तेथेच उपचार करून घ्यावेत असे मला सांगण्यात आले; पण क्रिकेटबाबतचे माझे जे धोरण होते त्यात ही बाब बसण्यासारखी नव्हती. खेळाडूने मैदानात उतरताना शारीरिकदृष्ट्या एकदम तंदुरुस्त असले पाहिजे असा माझा आग्रह असे. मग मी स्वतः आजारी असताना संघाचे नेतृत्व का म्हणून करावे? तब्येतीच्या कारणासाठी मी नकार कळवला!'

## खेळासाठी खेळ

क्रिकेटबद्दलच्या जुन्या आठवणी सांगताना ते म्हणाले, 'आमच्या वेळी आम्ही क्रिकेट एक खेळ म्हणूनच खेळत होतो. क्रिकेट हे त्या वेळी पैसे मिळवण्याचे साधन नव्हते. आम्ही वर्षामधले सहा महिने खेळत असू, तर सहा महिने आम्हाला चेंडूचे दर्शनही होत नसे! प्रथम श्रेणीचे क्रिकेट मी २२ वर्षे खेळलो; पण पैसे मिळवणे हा उद्देश अजिबात नसे! १९३६ सालच्या दौऱ्याच्या वेळी आम्हाला खर्चासाठी म्हणून दर आठवड्याला ५ पौंड देण्यात आले तर १९४६ सालच्या इंग्लंड – दौऱ्याच्या वेळी खेळाडूला आवश्यक असलेला चागला पोषाख करण्यासाठी प्रत्येकी १५०० रुपये देण्यात आले.'

मर्चंटचे क्रिकेट-जीवन जेवढे शिस्तबद्ध होते तेवढेच त्याचे आजचे उतार वयामधील जीवनही शिस्तबद्ध आहे. आजही विजय मर्चंट पहाटे पाच वाजता उठतात ९ वाजता त्यांच्या मिलची लेडी डॉक्टर येते. तब्येत पहाते. सर्व ठीक असल्याचे ती सांगून गेली की मग योगासनाचा कार्यक्रम होतो. १० ते १ विजय मर्चंट हिंदुस्थान मिलमध्ये आणि २ ते ६॥ वाजेपर्यंत विठ्ठलदास चेंबर्समधील त्यांच्या ऑफिसमध्ये असतात. ६–३० च्या पुढे त्यांच्या समाजकार्यास प्रारंभ होतो. अपंगाना सहाय्य करणाऱ्या अनेक संस्थाशी त्यांचा संबंध आहे. अंध, मूक–बधिर, मतिमंद अशा विविध कारणांमुळे त्रस्त झालेल्या मंडळीसाठी काम करून त्यांना जीवन समर्थपणे जगण्यासाठी सहाय्य करताना फार मोठे मानसिक समाधान मिळते, असे विजय मर्चंट बोलून दाखवतात. असंख्य अपंगांना नोकरी मिळवून देण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. अंधाना कौटुंबिक जीवन लाभावे, इतर चारचौघांप्रमाणे त्याचेही संसार फुलावेत यासाठी त्यानी परिश्रम करून अनेक अंधांची लग्ने लावून दिली आहेत. आकाशवाणीवर खास कार्यक्रम करून जनतेने या अपंगासाठी मदतीचा हात पुढे करावा म्हणून आवाहन केले आहे. विविध-भारतीवरील क्रिकेट-कार्यक्रम ते गेली दहा वर्षे सातत्याने सादर करीत आहेत. विजय मर्चंट यांचा आजच्या क्रिकेटशी फारसा संपर्क नसला, तरीही सुनिल गावसकरचा खेळ त्यांनी पाहिला असल्याने, त्याच्याबद्दल त्यांना प्रश्न विचारला असता, सुनिल निश्चितपणे उत्कृष्ट खेळाडू असल्याचा ते आवर्जून उल्लेख करतात. सातत्याने क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूच्या आयुष्यात एखादा वाईट कालखंड येतो. अशा कालखंडामधून जात असताना त्याला लिलीसारख्या विलक्षण वेगवान गोलंदाजाला तोंड द्यावे लागत असल्याने त्याची यशस्वी कारकीर्द झाकळून गेली आहे; पण हेही दिवस जातील आणि सुनिल पुन्हा पहिल्याप्रमाणे धावांचा डोंगर रचू लागेल असा विश्वास त्याना वाटतो. □

# गाडगीळांसारखे अर्थशास्त्र-प्राध्यापकही जेथे चकतात!

प्रा. अरविंद कुलकर्णी, अलिबाग

गेले ४–५ महिने शरद जोशी आणि शेतकरी आंदोलन हे दोन शब्द सारखे गाजत आहेत. त्याआधीही त्यानी कांदा–उत्पादकाचे एक आंदोलन उभे केले होते; पण जितक्या गंभीरपणे त्याची दखल घेतली जाणे आवश्यक होते तितकी ती घेतली गेली नाही. मराठी वा इंग्रजी वृत्तपत्रानी तर जवळजवळ त्याकडे एक स्टंट म्हणूनच पाहिले. आजवर शेतकऱ्याची अनेक आंदोलने उभी केली गेली होती, त्यापैकीच हे एक अशी त्याबी धारणा होती; पण हे आंदोलन म्हणजे शेतकरी वर्गात नव्याने सुरू होणाऱ्या एका चळवळीचे (movement चे) मुखस्थान आहे, शतकऱ्याना लाभलेला हा नेता वेगळा आहे, त्याच्याजवळ एक वेगळे असे जाणतेपण आहे आणि या आंदोलनाला त्याच्या लेखी क्षणिक वा केवळ याच एका प्रसंगापुरती किंमत नसून त्याच्या सातत्याचे आणि दिशेचेही भान आहे, या गोष्टी जशा लक्षात घेतल्या जायला हव्यात तशा घेतल्या गेल्या नाहीत, ही वस्तुस्थिता आहे. त्यामुळेच नेहमीच्या मराठी पद्धतीला जागून शरद जोशी यांची व या आंदोलनाची खिल्ली उडविण्याचे कर्म त्यासंबंधी लिहिणाऱ्या जवळजवळ सर्व मराठी पत्रकारितेने केले. 'माणूस' साप्ताहिक आणि श्री. विजय परुळकर हा पत्रकार याचे सन्माननीय अपवाद आहेत हे मात्र नमूद केले पाहिजे.

या लेखनामागे फक्त शरद जोशीचो हो चळवळ समजून न घेता घाईघाईने केलेले मतप्रदर्शन इतकाच दोषाचा भाग नव्हता. तसाच तो असता तर फारशी चिंता करण्याचा प्रश्न उद्भवला नसता. चिंतेची गोष्ट होती ती यातून शेतकऱ्याकडे पाहण्याची शहरी माणसाची दिसून येणारी प्रवृत्ता. शेतकरी आपल्यासाठी राबणारा आहे, त्याच्या श्रमाचे मूल्य नगण्य आहे आणि तो ज्याची निर्मिती साधतो त्याची किंमत ठरविण्याचा त्याला अधिकार नाही किंवा त्याच्याकरवी होणाऱ्या उत्पादनाची वाढती (मग ती वाजवी असली तरी) किंमत दिल्यास त्याचा इतर (विशेषतः शहरी) जीवनमानावर मोठा विपरीत परिणाम होईल हे ध्यानी घेऊन त्याने पडती किंमत स्वीकारूनच जगले पाहिजे अशा स्वरूपाच्या विचारानी घडलेली ही प्रवृत्ती आहे. शेतकऱ्याच्या रास्त हक्कासाठी झगडण्याचे स्वातंत्र्य धोक्यात आणणारी ही प्रवृत्ती आहे आणि ती निखालसपण चुकीची आहे.

शरद जोशी जिला 'इंडियावाले' म्हणतात ता ही प्रवृत्तीच होय. हिने इंग्रजाची शोषण करणाऱ्याची भूमिका पुढे चालू ठेवलेली आहे. इंग्रजानी सारे हिंदुस्थान ब्रिटनच्या सुखासमाधानासाठी आपले साधन बनविले, आता हे (शहरी) प्रस्थापित त्याच्या सुखासमाधानासाठी ग्रामीण परिसरानी बनलेला भारत साधन बनवीत आहेत अगदी 'किडलेली माणसे' दाखविणारे प्रा. गंगाधर गाडगीळांसारखे व्यापक सहानुभूती, संवेदनशीलता वगैरे वगैरे असणारे अर्थतज्ज्ञ लेखकही (आपटे उद्योगसमूहात बड्यापैकी नोकरी करणारे) जाहीर इशारे देताना दिसतात– 'शेतीमालाचे भाव वाढले की औद्योगिक उत्पादनाचे भाव वाढणे आणि त्याचे एकूण जीवनमानावरील दडपणही वाढणे अपरिहार्य आहे!' म्हणजे काय तर या शेतकऱ्याना जादा भाव देऊ नका! प्रा. गाडगीळांच्या या विधानात तथ्य नाही असे नाही; पण ते तथ्य एका चुकीच्या गृहीतावर आधारलेले आहे. त्याचा उल्लेख विवेचनाच्या ओघात पुढे येईलच.

शरद जोशीनी जाग्या केलेल्या शेतकऱ्याच्या सहवासात साहित्यिक गाडगीळ किंवा त्यांच्यासारखीच मते मांडणारे इतर टीकाकार जर काही काळ गेले तर हा शेतकरी आज उपस्थित करीत असलेल्या एका प्रश्नाचे त्याना उत्तर द्यावे लागेल. शेतीमालाचे भाव वाढल्याने औद्योगिक उत्पादनाचे भाव वाढतात आणि ते मान्य केले जातात. असे जर असेल तर औद्योगिक उत्पादनाचे भाव वाढल्यामुळे शेतीमालाचे भाव का वाढू नयेत? शेतीसाठी औद्योगिक उत्पादनाची जरुरी भासत नाही काय? याबद्दलचा तपशील वाढविण्यात अर्थ नाही. तसेच कर वाढले की ज्या वस्तूंच्या संदर्भात ते वाढलेले असतात त्याच्या किंमती राजरोसपणे एका रात्रीत वाढतात आणि त्या शासनाकडून मान्यही केल्या जातात, गिऱ्हाइकाकडूनही थोड्या-फार बारीक कुरकुरीनंतर स्वीकारल्याही जातात; पण रासायनिक खताचे भाव वाढले, पिकाच्या औषधाचे भाव वाढले, साध्या खुरप्यापासून नागरापर्यंतच्या नानाविध अत्यावश्यक अवजाराचे भाव (लोखंडाच्या भाववाढीमुळे) वाढले तरी शेतकऱ्याच्या शेतमालाचे भाव आपले स्थिरच! मागच्या चलाखीच्या अंदाजपत्रकाने रासायनिक खतावरील कर वाढविला आणि एका रात्रीत १४०० रुपये टन भाव असलेले युरिया दोन हजार रुपये टन झाले; पण शेतकऱ्याच्या तांदळाला किंवा तंबाखूला हे वाढीव ४५ टक्के ध्यानी घेऊन चढता भाव मिळाला का? नाही! असेच त्याचे उत्तर आहे. वाढलेल्या कराचे कारण सांगून बारा पैशाची साधी काड्याची पेटी एका रात्रीत वीस पैस्यांना विकली जाते. तिच निर्माते आणि विक्रेते ग्राहकाला ठणकावून 'वाटल्यास घ्या!' असे सांगू शकतात. शेतकरी असे सांगू न शकणारा दुबळा प्राणी आहे. म्हणूनच त्याला शेतीचा खर्च, अवाच्या सव्वा औद्योगिक उत्पादनाच्या दरवाढीनुसार वाढत असतानाही, आपल्या मालाचा भाव वाढविता येत नाही, हेच मागील सत्य आहे ना? त्याने असेच दुबळे राहायचे? आणि त्याला दुबळे ठेवण्यात समाधान मानीत,

त्याला, 'बाबा रे, देशाच्या आणि समाजाच्या स्वास्थ्यासाठी तुला हा ताण सोसलाच पाहिजे !' असे गाडगीळासारख्या या देशातील अर्थतज्ज्ञानी मोठ्या गंभीरपणे, भल्या मोठ्या आकड्यांचे हिशेब फेकीत सांगायचे हा कुठला न्याय ? ही कुठली लोकशाही ?

शेतीमालाचे भाव वाढले की बाकीच्या साऱ्या वस्तूंचे भाव वाढतात हा सिद्धान्त काही चूक नाही; पण यात एका चुकीच्या गृहीताचा नेहमी आसरा घेतला जात असतो असे दिसते. तो म्हणजे शेतीमालाचे शेतकऱ्याला मिळणारे भाव आणि शेतीमालाचे बाजारात असणारे भाव यांची केली जाणारी गल्लत. खरे तर या दोहोत नेमका असा संबंध कधी नसतोच किंवा तो असावा अशी दक्षताही घेतली गेलेली दिसत नाही. उदा. कडधान्ये घ्या आज बाजारात त्याचा भाव साधारणपणे ५ रुपये किलोच्या घरात आहे. हाच भाव मनात धरला जातो आणि शेतीमालाचे भाव वाढल्यास या ५ रुपयाचे ६ वा ७ रुपये होणार अशी भीती व्यक्त केली जाते. पण आजही बाजारात पाच रुपये भावाने विकले जाणाऱ्या कडधान्याच्या उत्पादक शेतकऱ्याला काय भाव मिळतो याचा हे अर्थतज्ज्ञ केव्हा विचार करणार ? त्याला अडीच–पावणेतीन रुपये भाव मिळतो आणि बाजारात त्याचे पाच रुपये होतात ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे विक्रीच्या वा वितरणाच्या बाबतीत बेफिकिरी नि बेपर्वाई कमालीची आहे. शेतकऱ्याला मिळणाऱ्या भावाला आधारभूत मानून वितरणासाठी येणारा खर्च, घसारा व निश्चित केलेली नफ्याची टक्केवारी यांच्या जुळणीतून बाजारभाव ठरविला गेला पाहिजे, हे कुणीही मान्य करील आणि तसे जर झाले तर कडधान्याचा शेतकऱ्याला मिळणारा भाव अडीच रुपयावरून साडेतीनवर जरी गेला तरी त्यामुळे आजच्या पाच रुपयाच्या घरात असलेल्या बाजारभावावर फारसा परिणाम होण्याचे कारण नाही. चिकोडी तालुक्यातील निपाणीजवळच्या अकोळ, गळतगा, जत्रायलभोज वगैरे तंबाखू–उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या खेड्यातील चांगला तंबाखू साधारणपणे ८ ते १४ रुपये किलोने खरेदी केला जातो आणि त्यात हलक्या प्रतीचा साधारणपणे तीन ते पाच रुपये किलो दराचा तंबाखू एका किलोस दोन-अडीच किलो अशा प्रमाणात मिसळून ती मिसळ बारा ते अठरा-वीस रुपये दराने विकली जाते ! शिवाय या तंबाखूच्या दराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तो मनमानी आहे. निश्चित वस्तुनिष्ठ अशा गुणवत्तेवर तो आधारित नाही. गुणवत्ता सर्वस्वी व्यक्तिनिष्ठ असते. 'ओढणाऱ्या'ने झुरका मारून तंबाखूची प्रत ठरवायची आणि किंमतही ठरवायची इतका हा व्यक्तिनिष्ठ प्रकार आहे. मग अनेकदा एकाच शेतातल्या तंबाखूची अनेक व्यापाऱ्यांच्या 'ओढणाऱ्यां' कडून अनेक प्रकारची गुणवत्ता ठरते. तशीच किंमतही ठरते. काही वेळेला शेतकऱ्याला बरा भाव मिळविण्यासाठी आजच्या भ्रष्टाचाराच्या राजरोस मार्गाचा अवलंब करावा लागतो. 'ओढणाऱ्या'ची आतून मूठ दाबली की दोन नंबरचा तंबाखू दीड नंबरवर तरी येतो. आज निपाणीसारख्या तंबाखूसाठी प्रसिद्ध असणाऱ्या सधन शहरात अशा 'ओढणाऱ्या' टेम्टर मंडळींनी जमा केलेल्या जायदादीची पहाणी केली की या आरोपात तथ्य आहे असे वाटू लागते ! आता अशा स्थितीत वावरणाऱ्या शेतकऱ्याने भाव रीतसर वाढवून मिळावेत म्हणून आंदोलनाचा मार्ग पत्करला तर बिडी, सिगारेट वगैरेची किंमत वाढणार म्हणून अर्थतज्ज्ञ हाकाटी पिटणार आणि शहरी जनता शेतकऱ्यांच्या नावे ठणाणा सुरू करणार !

## जीवनसन्मुख अर्थशास्त्र

अर्थशास्त्राचे अवमूल्यन करण्याचा प्रस्तुत लेखकाचा इरादा नाही; पण अलीकडे या आंदोलनाच्या निमित्ताने त्याच्यासारख्या अर्थशास्त्राबद्दल धाक आणि आदर असणाऱ्या सामान्य माणसाला मात्र असे वाटू लागले आहे की, आपल्या अर्थशास्त्रज्ञानी जरा जमिनीवर पाय ठेवून विचार करायला हवा. नुसते त्यांच्या टेबलावर येणारे तक्ते, आकडे, टक्केवाऱ्या, हिशेब व तज्जन्य अनुमाने यांच्या विळख्यातून बाहेर यायला हवे इथे हेही स्पष्ट करणे आवश्यक आहे की, अर्थशास्त्रज्ञाच्या या साधनांचीही टवाळी वा व्यर्थता व्यक्त करण्यासाठी हे लिहिले नाही. त्यांच्या या साधनांचीही जरुरी आहे. फक्त अर्थशास्त्रज्ञाने त्यांना ओलांडून, त्याविषयीच्या विचारांना एक प्रत्यक्ष जीवनसलग्न मिती द्यावी, इतकाच हे लिहिण्यामागे हेतू आहे.

सुदैवाने सध्या आकार घेत असलेल्या शेतकरी आंदोलनाला लाभलेला शरद जोशीसारखा नेता अर्थतज्ज्ञ आहे. जे गंगाधर गाडगीळ आदींना समजते ते समजण्याची निश्चितच या शरद जोशीची कुवत आहे. ज्या आकड्या-हिशोबांचा, तक्त्यांचा वापर शेतकऱ्याच्या आंदोलनाच्या संभाव्य भयावह परिस्थितीच्या संदर्भात सतत केला जातो त्या साऱ्यांशी जोशींचा परिचय आहे, हे या संदर्भात मुद्दाम ध्यानी घेतले पाहिजे. त्याबरोबरच जोशींच्या ज्ञानाला वरच्या परिच्छेदात आवश्यक म्हणून सांगितलेली जीवनसंलग्नतेची मितीही आहे असे दिसते. नाही तर चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या मार्गदर्शक सूत्रात 'शेतीउत्पादनाचा खर्च लक्षात घेऊन शेतीमालाचे भाव ठरविण्यात येऊ नयेत' असा असणारा उल्लेख इतर अर्थतज्ज्ञांप्रमाणे किंवा अगदी शेतीअर्थतज्ज्ञ (Agroeconomist) म्हणविल्या जाणाऱ्या विशेषज्ञाप्रमाणे त्यानाही डसला नसता.

हा उल्लेख शेतकऱ्याच्या बाबतीत अन्यायकारक आहे असे राजकारणी धुरीणाबरोबरच अर्थकारणी धुरीणांनीही आजवर का सांगितले नाही, त्यांची ती जबाबदारी नव्हती का, असे आज एखाद्या शेतकऱ्याने विचारले, तर त्याला ही मंडळी काय उत्तर देणार ? ती फक्त असे सांगणार काय की ते आमचे काम नव्हे, आमचे काम फक्त तक्ते वगैरे गोळा करून काही निष्कर्ष काढण्याचे आहे. ही अर्थतज्ज्ञ मंडळीच सांगतात की, भारतात सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. म्हणजे हा देश शेतकऱ्याचा आहे हे गांधीजींचे कदाचित् भाबडे असणारे मत अर्थशास्त्रशुद्धही आहे. मग या इतक्या मोठ्या घटकाची हेतुपुरस्पर केली जाणारी आर्थिक गळचेपी चव्हाट्यावर मांडावी, त्यांच्यासाठी न्याय मागावा हे अर्थशास्त्राला आजवर सुचले नाही हे त्यांच्या किंवा ते राबविणाऱ्या तज्ज्ञांच्या जीवनविन्मुखतेचे लक्षण आहे, असे म्हटले तर ते वावगे का ठरावे ? हे छातीठोकपणे सांगणारा आणि नुसते आपल्या केबिनमध्ये बसून न सांगता त्यासाठी आवश्यक ती जागृती करून, संघटना बांधून, या क्षेत्रातील प्रस्थापितांची झोप उडवील असे रान उठविणारा शरद

जोशी हा पहिला नि खराखुरा शेतकरीनेता आहे असे म्हणले तर चुकते कोठे ? आज कदाचित् अतिशयोक्तीचा आरोप येईल; पण तो पत्करूनही असे म्हणावेसे वाटते की, दलिताना डॉ. आंबेडकरांच्या रूपाने जसा पहिल्यादाच सर्वार्थाने समर्थ नेता लाभला तसाच या शरद जोशीच्या रूपाने आज शेतकऱ्याना नेता लाभला आहे

आपल्याला फक्त शेतकऱ्याचे प्रश्न सोडवायचे आहेत या जाणीवेची पकड आजपर्यंत तरी शरद जोशीनी ढिली होऊ दिलेली नाही असे दिसते आणि त्यातच त्याच्या आदोलनाचे अपूर्वत्व आहे. आजवर झालेली सारी शेतकरी आदोलने राजकीय जाणीवेपोटी झालेली आहेत. राजकीय हेतू साध्य झाला की आदोलने निवळत. शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच बाजूला पडत. या वस्तुस्थितीला शरद जोशीनी अडगळीत टाकलेले आहे; पण असे आदोलन म्हटले की ते राजकीय दृष्टिकोणातूनच पाहायचे ही जुनी सवय जाणत्याच्या बाबतीतही गेलेली आहे असे दिसत नाही. शुद्ध, निर्मळ, वस्तुनिष्ठ स्वरूपात अशी आदोलने वा चळवळी पाहण्याचे इद्रियच आपण गमविले आहे की काय, असेच जे घडले त्यावरून वाटू लागते. एक तर सर्वच पक्षाचे पुढारी आपली शेतकऱ्यावरील पकड ढिली होते आहे या चिंतेने ग्रासलेले. त्यात त्याना अंतुलेशासनाविरुद्ध बराच आयता भडका उडेल नि त्यात पुन्हा हात धुऊन घेता येतील असे वाटले असावे. तसे वाटण्यात काही गैरही नाही. त्यातच शरद जोशीच्या पाठिराख्यात इंदिरा कॉंग्रेसवादी मंडळी जास्त. शरद जोशीनीही अंतुल्याशी धीमेपणाने बोलणी करायला सुरुवात केली. आदोलनाचा मुहूर्त ते पुढे ढकलत राहिले. यावरून लगेच या विरोधी पक्षाच्या पुढाऱ्यानी आणि काही वृत्तपत्रानीही 'जोशी अंतुल्याच्या आहारी गेले' अशी ओरड सुरू केली; पण अंतुले आहेत म्हणून जोशी दमाने घेताहेत ही वस्तुस्थिती नव्हती. शेतकऱ्याच्या दृष्टीने बोलणी योग्य मार्गावर आहेत याची जाणीव त्यामागे होती. अंतुले मुख्यमंत्री या प्रसंगी आहेत हा एक योगायोग होय. त्याच्याऐवजी कुणीही मुख्यमंत्री असता तरी जोशी असेच वागले असते असे वाटते. जोशीनी या सर्व गदारोळात एक गोष्ट फार चागली केली. ती म्हणजे विरोधी प्रचार उतास आलेला असतानाही ते शात राहिले. उत्तरे देण्याच्या, वादावादी करण्याच्या, आपलेच खरे आहे असे दाखविण्याच्या भरीस ते पडले नाहीत. मराठी माणूस असूनही त्यानी हे सारे टाकले म्हणजे औरच म्हटले पाहिजे.

## आंदोलनाचे यश निर्विवाद

शरद जोशीच्या हालचालीचा उपयोग झाला नाही असे शेतीशी संबंधित असणारा कुणीही प्रामाणिक माणूस म्हणेल असे वाटत नाही. आज उसाच्या बाबतीत असे झाले आहे की, शेतकऱ्याला ॲडव्हान्स म्हणून टनामागे दोनशे रुपये तर मिळू लागलेले आहेतच; पण रेठऱ्याच्या सहकारी साखर-कारखान्यासारख्या कारखान्याचे ठिकठिकाणचे खरेदी-मदतनीस शेवटचे बील ३५०-३६० रु. टन या भावाचे होईल, असे सांगू लागले आहेत. महाराष्ट्राला लागून असणाऱ्या बेळगाव जिल्ह्यात तर गंमतच झालेली दिसते. चिकोडी तालुक्यातील अकली येथील सहकारी साखरकारखाना आजवर शंभर रुपयाच्या आत टनामागे ॲडव्हान्स देत असे. त्याने या वर्षी टनामागे २२५ रु. ॲडव्हान्स द्यायला प्रारंभ केला आहे संकेश्वरचा साखर कारखाना १२५ रु देत असे. त्याने यावर्षी २५० रु द्यायला प्रारंभ केला आहे. या कारखान्याने गेल्या वर्षीचे final bill तीनशे रुपयावर भाव देऊन केले आहे. ही सारी शरद जोशीप्रणीत आदोलनाची कृपा आहे हा जोशी आपल्या शेतकऱ्यात घुसणार नाही याची जारीने काळजी घ्या, अशी दस्तुरखुद्द मुख्यमंत्री गुडूराव यानीच आज्ञा केल्याची या भागात बोलवा आहे. आता निपाणीच्या परिसरात शरद जोशीनी तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याचे आदोलन उभे करण्याचा निश्चय जाहीर केलेला आहे. त्यातही ते यश मिळविणार हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे या म्हणण्याचा अर्थ शरद जोशी ही कुणी एक महान् दैवी वगैरे विभूती आहे असा मुळीच नाही. अन्यायच इतक्या पद्धतशीर रूपात गेली अनेक वर्षांपासून केला जातो आहे आणि त्याने इतके क्रूर स्वरूप धारण केलेले आहे की, त्याच्या किमान का होईना पण उच्चाटनाशिवाय परिमार्जनाचे दुसरे साधनच नाही. हे खरे असले तरी वास्तव स्थितीची कल्पना नागविल्या जाणाऱ्या लोकाना कुणी तरी चोख, नि:स्पृह व नि:स्वार्थीरीत्या करून द्यावी लागते. हे पुण्यकर्म आज शरद जोशी करीत आहेत. या माणसाला खरोखरच कसलाही स्वार्थ असल्याचे दिसत नाही. शेतीचा त्याचा अभ्यास नुसताच पुस्तकी नाही. आपला व्यासंग नि चाकणच्या परिसरातील कोरडवाहू शेतीचा अनुभव याद्वारा त्याच्या ठिकाणी जे जे जमा झालेले आहे ते ते उदारहस्ते या भूमीतील भूमिपुत्राना द्यायची त्याची तयारी आहे.

त्यामुळेच सर्व राजकीय पुढाऱ्याचा नि तुलनेने शेतकऱ्याहून कमी असले तरी संघटनेच्या जोरावर आपल्याला हवे ते हक्काने हिरावून घेणाऱ्या, कामगार वा बाबूलोकाच्या सघटनांचा विरोध वा जहरी प्रचार सतत चालू असतानाही, लाखोच्या संख्येने शेतकरी शरद जोशीच्या मागे उभे राहात आहेत. कानात सतत वीष ओतले जात असतानाही या 'बामण-बाबू' पुढाऱ्यावरील प्राबल्याने बहुजन समाजीय असलेल्या शेतकऱ्याच्या निष्ठेला तडा जात नाही ही, निदान आजच्या या जातीपातीचा वर्गभेदाचा बुजबुजाट झालेल्या कालात तरी, अपूर्वाईची गोष्ट म्हणावी लागेल.

असे सागण्यात येते की, राजकारणी नेते हे माणूस ओळखण्यात फार कुशल असतात. त्याना म्हणे कुठल्याही माणसाची किमत पाहण्याचे, वाचण्याचे एक इद्रियच लाभलेले असते. ते सारे अतिरथीमहारथीही या शरद जोशीना जोखण्यात कसे फजित झाले हे आता सर्व महाराष्ट्र जाणतो आहे. विशेषतः सत्ताधारी इंदिरा कॉंग्रेसचा फजितवाडा खूपच प्रेक्षणीय आहे. महसूलमंत्री शालिनीताई पाटील, पक्षाचे सरचिटणीस श्री वसंतदादा पाटील, मंत्री बळिराम हिरे इत्यादि मंडळी आपलेच शब्द कसे गिळू लागली हे पुन्हा सांगायची जरुरी नाही. मुख्यमंत्री बॅ. अंतुले हे प्रथम जोशीची भेट घ्यायलाही तयार नव्हते. नंतर मात्र 'जोशीची भेट समाधानकारक वातावरणात पार पाडली. आमची बोलणी प्रगतीपथावर आहेत' असे मुद्दाम चेहरा हसरा वगैरे करून पत्रकारपरिषदातून ते गौरवाने सांगू लागले, याला काय म्हणायचे ? खरे तर काही म्हणूच नये ! सारे समजून घ्यावे आणि उगा बसावे हेच चागले !


शेतकरी म्हटला की तो बुलेटगाड्या वापरणारा सधन शेतकरी अशी त्याची एक प्रतिमा शहरी मनाने मोठ्या चवीने स्वत:शी जोपा-

सली आहे. पण असा शेतकरीवर्ग महाराष्ट्रात खूपच कमी; अल्प-भूधारक आणि शेतीवर काबाडकष्ट करणारा शेतमजूर हाच बहुसंख्य आहे. त्याची स्थिती सुधारली पाहिजे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. त्यांच्याबद्दलची सहानुभूतीही आजवर अनेकांच्याकडून राजकीय स्वार्थासाठी योजिली गेली. किंबहुना १९३० सालापासून महाराष्ट्रातला सारा शेतकरी कॉंग्रसने अशाच सहानुभूतीच्या जोरावर एकत्र केला. त्याच्या जिवावर सत्ता मिळविली, राज्य केले. आता या पक्षात शकले होताच पुन्हा या शेतकऱ्याचा पाठिंबा मिळविण्याचेच या शकलांचे प्रयत्न चालू झालेले आहेत. यशवंतराव चव्हाणांसारखा शेतकऱ्याचा मुलगा म्हणविणारा माणूस खूप मोठमोठी पदे भोगून गेला; पण हा शेतकरी आहे तसाच राहिला ! शेतीच्या विश्वात हरितक्रांती झाली, धवलक्रांती झाली; पण शेतकऱ्याची लंगोटी व खोपट जसेच्या तसेच राहिले ! छोटा शेतकरी आणि शेतमजूर अधिकाधिक दरिद्री होत गेले. हे सारे आता शरद जोशींच्या नेतृत्वाखाली एकत्र येत आहेत. त्यांच्या खांद्यावर शेतकऱ्याचेच निशाण आहे. खऱ्या अर्थाने ग्रामीण परिसर, केवळ ग्रामीण परिसराच्या अभ्युदयाच्याच एका प्रबळ इच्छेने एकवटतो आहे. यात खरा तर शहरी जीवनाला धोका नाही. व्यवस्थापन वा वितरणाचे काम शासनाने चोखपणे पार पाडायचे ठरविले तर शहरी माणसावर याचा ताण खरोखरच येणार नाही. शरद जोशी देत असलेले उसाच्या नव्या भावाचे व साखरेच्या भावाचे उदाहरण पाहण्यासारखे आहे. उसाला शेतकऱ्याला टनाला तीनशे रुपये भाव देऊन साखरेचा भाव कडाडणार नाही. कारण टनभर उसात १०० ने १०५ किलो साखर होते आणि तोडणी वाहतूक, गळित, व्यवस्थापनीय खर्च, वितरण वगैरेसाठी जास्तीत जास्त टनभर उसामागे ४२५ रु. खर्च येतो. म्हणजे शेतकऱ्याला ३०० रु. टन भाव देऊनही क्विंटलभर साखरेचा उत्पादन व वितरणखर्च मिळून ४२५ रुपये होतो. ही साखर पाच रुपये किलोने, कारखान्याला चांगला नफा होऊन, भारतात कुठेही विकता येईल असा जोशींचा हिशेब आहे. आणि मुख्य म्हणजे साखरव्यवसायात असणाऱ्या अनेकांनी तो मान्य केलेला आहे. नेहमीप्रमाणे सत्तारूढ पक्षाचेही पुढारी प्रारंभी त्याला मूर्खपणा म्हणून आता मान्यता देऊ लागले आहेत ! तसेच शेतीच्या उत्पादनखर्चाबाबत शरद जोशींनी जो तपशीलात्मक तक्ता सादर केलेला आहे त्यालाही कोणा शेतकी–अर्थतज्ज्ञाने किंवा शासकीय पातळीवरील मंत्र्याने वा अधिकाऱ्याने विरोध केल्याचे दिसत नाही. आजवर नाना आकडे–हिशेब शेतकऱ्यांच्या तोंडावर फेकून त्यांचे तोंड बंद करणे जमत गेले होते. कारण हा गुंतवळा नीट पारखणारे नेतेच त्यांच्याजवळ नव्हते. पण आता परिस्थिती बदललेली आहे. आता त्यांना जाणकार नेतृत्व मिळालेले आहे.

तेव्हा शरद जोशींनी उभ्या केलेल्या आंदोलनाचा योग्य मार्गाने विचार व्हायला हवा. विशेषतः शहरी जनतेने आणि पत्रकारितेने विशेष जागरूकतेने उचित बोध यातून घेतला पाहिजे. आधीच अनेक तऱ्हेच्या दुहीच्या जाणिवांनी आपला समाज व देश विचलित झालेला आहे. त्यास अशा आणखी एका दुहीची भर पडणे योग्य होणार नाही आणि खोलवर विचार केला तर यामुळे ग्रामीण भागाची भरभराट आणि शहरी भागात खडखटाट अशी स्थिती होणार नाही, अशी वस्तुस्थिती आहे. प्रश्न आहे मधली बेसुमार नफेखोरी थांबविण्याचा. त्यासाठी ग्रामीण व शहरी या दोघांनीही हातात हात घालून प्रयत्न केले पाहिजेत. मुख्य म्हणजे फक्त मतपेटयांच्या आहारी जाऊन लोकहित विसरणाऱ्या शासनाला शुद्धीवर आणण्याचे काम या दोघांनीही करायला पाहिजे. ते एकजुटीनेच होईल. बाजारभावावर चालला तर शासनाचाच अंकुश चालणार आहे.

या आंदोलनाची सांगता यशानेच होणार आहे हे नक्की ! शेतकऱ्यांना जास्त भाव मिळतील तेही शेतकऱ्यांच्या प्रेमापोटी नव्हे तर पुन्हा मतपेटयांच्या राजकीय कारणासाठीच, याची जाणीव शरद जोशींना नसेल असे नाही. त्यांच्या नेतृत्वाचा कस या यशानंतरच लागणार आहे, हेही खरे. त्या वेळी निर्माण होणाऱ्या इतर छोटया मोठया प्रश्नांबरोबरच, जादा भाव मिळाल्याने खेड्याकडे वळलेला संपत्तीचा ओघ निर्मितीक्षम (Productive) बनविण्यासाठी, ग्रामीणांचा शहराकडे झेपावणारा ओघ थांबविण्यासाठी, ते कोणते उपाय सुचवितात नि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याला कसे तयार करतात, हा एक महत्वाचा प्रश्न असेल. त्यासाठी एकदम आगाऊच मतप्रदर्शन करण्यापेक्षा टीकाकारांनी थोडी वाट पाहणेच सर्वांच्या हिताचे होईल. सध्या आपण शरद जोशींना करता येईल ती मदत करावी. किमान आपल्या खास शहरी ढंगाने जोशींना आणि त्यांच्या शेतकरी–परिवाराला 'बेस्ट लक्' तरी द्यावे ! □


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र
किमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## श्यामचा संसार (कथा – ४)

फिरोझ रानडे

# श्रीमती आशा आवळे–जावळे यांचेबद्दल थोडेसे

नवऱ्याने काही केले वा केले नाही तरी बायकोच्या प्रश्नावलीतून त्याची काही सुटका होत नाही हेच खरे.

आता हेच बघाना– नवरा एखादा दिवस कचेरीतून लवकर आला तर 'आज लवकरसे आलात? प्रकृती बरी आहे ना?' जर एखादा दिवस उशीर झाला तर लगेच 'आज उशीरसा झाला? प्रकृती बरी आहे ना?' बरे, अगदी वेळेवर येणाऱ्या नवऱ्याची तरी ह्या प्रश्नचक्रातून सुटका असते का? नाव नको. अगदी वेळेवर जरी नवरा आला तरी बायको विचारणार, 'आज अगदी वेळेवरसे आलात? प्रकृती बरी आहे ना?'

नवऱ्याने जरा गबाळे कपडे केले की 'काय हे कपडे? असे कपडे करून का ऑफिसला जातात?' हा प्रश्न ठरलेला. वरं जरा बरे कपडे केले की 'आज एवढा थाटमाट कशासाठी? कचेरीत काही आहे वाटतं?' हा प्रश्न! राधाही ह्याला अपवाद नव्हती.

श्यामने आज जरा बरे कपडे केले आहेत हे पहाताच ती लबालबा बाहेरच्या खोलीत आली व विचारती झाली, 'आज काही खास? कोणाला या कोणीला भेटायला जावयाचे आहे वाटतं?'

हे जर लग्नानंतरचे पहिले-वहिले दिवस असते तर श्यामने काही तरी थाप ठोकून दिली असती; पण सर्व नवऱ्याप्रमाणे तो एक गोष्ट चटकन शिकला होता. ती म्हणजे बायकोशी खोटं बोलणे ही अगदी अशक्यप्राय गोष्ट आहे. ते तावडतोब उघडकीला येतेच येते व त्यानतर होणाऱ्या 'शोभा यात्रे'पेक्षा प्रथमच खरे बोललेले उत्तम!

विलायतेत की अमेरिकेत माणूस खोटं बोलतो आहे का हे पहाण्याकरता एक विजेचे यंत्र निघाल्याचे श्यामने वाचले होते. हे वाचून काय हा विजेचा दुरुपयोग, असा प्रश्न मनात येऊन तो चुकचुकला होता. त्याचे असे स्पष्ट मत होते की, माणूस खरे बोलतो आहे की खोटं हे पहायला बायकोसारखे १०० टक्के विश्वासू व तेही स्वयंचलित असे दुसरे यंत्र नाही! असो.

राधाने मगाचाच प्रश्न थोडा शब्दांचा फरक करून विचारला. श्याम हा अनुभवी नवरा असल्याकारणाने राधाला थाप मारावी असा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही व आज काय काम होते तेही मोठ्या अभिमानाने सागण्यासारखे होते. म्हणून त्या अभिमानातच तो म्हणाला, 'yes, आज मला श्रीमती आशा आवळे–जावळे याना भेटावयाला जावयाचे आहे खरं म्हणजे, साहेबच जाणार होते; पण त्याना अनपेक्षितपणे दिल्लीला जायला लागलं म्हणून मला जावयाला सांगून ते गेले आहेत– श्रीमती आशा आवळे–जावळे I. A. S., Senior Deputy... वगैरे वगैरे; पण तुला त्यातले काही कळावयाचे नाही!' असे म्हणून बुटाची नाडी बाधण्याकरता श्याम खुर्चीवर बसला

'त्यात काय आहे न कळण्यासारखे? अहो, आशा जावळे म्हणजे खांद्यापर्यंत केस कापलेली, गळ्यात मंगळसूत्र न घालणारी, सिगरेट ओढणारी व मुलाखतीच्या वेळात ज्यांचा फोन १०–१२ वेळा खणाणतो त्याच ना?'

'अरे तिच्या मारी!' अनपेक्षितपणे श्यामच्या तोंडून अशिक्षित माणसं आश्चर्य दाखवण्याकरता वापरतात तसे शब्द बाहेर पडले. तो ताडकन उभा राहिला. आताच आपण तुला त्यातले काही कळणार नाही म्हणालो तर ही ज्योतिष्यासारखी घडाघडा सगळी माहिती देऊ लागली आहे की!

'एवढेच काय पण स्त्री-मुक्ती चळवळ, स्त्री-स्वातंत्र्य लढा, हुंडाविरोधी मोहीम, बलात्कार कायद्यात दुरुस्ती, सतीच्या चालीविरुद्ध मोर्चा ह्या सगळ्या लढ्यात पुढाकार घेणाऱ्या महाराष्ट्राच्या आधुनिक लक्ष्मीबाई म्हणजे श्रीमती आशा आवळे-जावळे ह्याच होत!' राधाने भाषण ठोकले. कारण सोपे होते गेल्याच आठवड्यात वनितामंडळात आशाबाईंचा सत्कार झाला होता.

पण ते ऐकून श्यामला आता 'अरे तिच्या मारी' म्हणण्याचे पण भान राहिले नाही. एका बाजूला आपल्या बायकोला एवढ्या मोठ्या साहेबिणीबाबत एवढी माहिती आहे हे बघून त्याला आनंद झाला होता, तर दुसऱ्या बाजूला श्रीमती आवळे जावळे यांचे कौतुक करण्याचा आपला चान्स गेल्याबद्दल हळहळ वाटली.

श्रीमती आशा आवळे-जावळे होत्याच तशा कर्तृत्ववान! पूर्वी Steel frame म्हणजे पोलादी चौकट म्हणून प्रसिद्धीला आलेल्या I. C. S. चे वारसदार म्हणून नाव मिळवलेल्या सर्विसेसच्या त्या अधिकारी होत्या. ती सर्विस पोलादी आहे की रबरी आहे हे त्या सर्विसमधल्या अधिकाऱ्यांना कळत नव्हते वा जनतेला! पण तो भाग वेगळा. श्रीमती आशा आवळे-जावळे यांनी वेगवेगळ्या अधिकाराच्या जागा भूषवल्या होत्या. पण ह्या सर्व माहितीपेक्षा राधाने पुरवलेली माहिती जास्त रोचक व मनोरंजक होती.

श्याम परत खाली बसला व दुसऱ्या बुटाची नाडी बाधू लागला खरं म्हणजे तो नेहमी चपला घालत असे, पण आज श्रीमती आवळे-जावळे याना भेटावयास जावयाचे म्हणन बूट! पण सवय नव्हती म्हणून वेळ लागत होता एवढेच.

'पण हे सागा की या बाई आवळे-जावळे असं जुळं आडनाव काय लावतात?' राधाने पदराला हात पुसत विचारले. श्यामला हा प्रश्न आवडला नाही तसा रागही आला नाही. कारण हे आवळे-जावळे नाव ऐकल्यापासून त्याच्याही मनात ह्याच प्रश्नाने घर केले होते असे कसे जुळे नाव बुवा? एका पुरुषाला दोन बायका करता येत नाहीत असं हिंदू कायदा म्हणतो; पण एका बाईला दोन नवरे करता येतात की नाही या प्रश्नावर हिंदू कोडाने श्यामला कोड्यात टाकले होते. कदाचित् ह्या श्रीमतीनी आवळे व जावळे ह्या दोन सज्जन गृहस्थाशी लग्न केले असावे व म्हणून त्या दोघाचे नाव लावत असाव्यात असाही भावडा विचार त्याच्या मनात येऊन गेला.

पण मग त्याच्या लक्षात आले की आजकाल स्त्रियाचे प्रश्न हाती घेणाऱ्या बायका एका नवऱ्याजवळही सुखाने रहात नाहीत तर ह्या दोन नवऱ्याजवळ कशा राहतील? त्यामुळे ती कल्पना बाद झाली.

नंतर त्याला वाटले की, आवळे जावळे हे काही सौंदर्यप्रेमी लोकानी त्याना टोपणनाव दिले असावे असे वाटण्यामागे एक मोठा

इतिहास होता. श्यामला आपल्या तरुणपणीच्या काळात, माडगुळकरांनी एका पुरंध्रीच्या पाठमोऱ्या हालचालीला 'आवळी-जावळी' असे विशेषण दिल्याचे आठवत होते. खरं तर 'आवळी-जावळी' ही उपमा 'पाठमोऱ्या' हालचालींना पण देता येण्या सारखी असते. तेव्हा आशाबाईंना असे कोणी टोपणनाव दिले असावे की काय ? पण मग असा लोकांनी दिलेला किताब त्या सरकारदरबारी कसा लावतील ? ह्या प्रश्नाने त्याच्या मनाला गप्प केले.

गप्प होण्याचे दुसरे कारण म्हणजे आता निघायची वेळ होत आली होती. साहेबानी गवढे विश्वासाने टाकलेले काम पार पाडणे आवश्यक होते. ठरल्या वेळेवर जाणे जरुरीचे होते. तेव्हा, 'असं कसं हे जुळं नाव ?' हा राधाचा प्रश्न बरोबर घेऊन राधाला घरीच सोडून श्याम तडक घराबाहेर पडला.

बरोबर १०-३० वाजता श्रीमती आवळे-जावळे यांनी बोलावले होते. श्याम बरोबर १०-३० वाजता पोहोचला व P. A. ला बाईंना मी आल्याचे कळवा, म्हणाला P. A. ने बाईंना कळवले; पण श्याम काही कोणत्या frame मधला अधिकारी नव्हता. त्यामुळे त्याला लगेच खोलीत बोलावणे थोडे कमीपणाचे वाटल्यामुळे बाई मोकळ्या असूनसुद्धा त्यानी श्यामला चांगले अर्धा तास ताटकळत ठेवले. अर्थात श्यामही सरकारी खात्यात बरीच वर्षं असल्यामुळे त्याला ताटकळत बसण्याची सवय झाली होती व दुसरे म्हणजे ऑफीसमध्ये जाऊन तरी काय मोठे काम करावयाचे होते ? त्यापेक्षा ह्या वातानुकूल वातावरणात थोडा जास्त वेळ गेलेला बरा असेच त्याला वाटत होते.

पण श्याम पुढ्यातच बसला असल्याकारणाने P. A. ची मोठीच पचाईत झाली. त्याला आपले खाजगी काम करता येईना. मग P. A. ने पूर्वीच्या साहेबांची व आत्ताच्या साहेबिणीची तुलना करायला सुरुवात करून पूर्वीचे साहेब appoitment पाळण्याबाबत फारच चागले होते हे सिद्ध केले; पण श्यामला पूर्वीच्या साहेबात काहीच रस नसल्यामुळे त्याने ते शांतपणे ऐकून घेतले.

थोड्याच वेळात श्रीमती आशा आवळे जावळे यांनी श्यामला आत बोलावले. तो आत शिरता-शिरता 'Good morning-Sir चुकलो–Madam' म्हणण्याचे आतच 'you have come from Ashok–haven't you ?' असे त्या विचारत्या झाल्या. अशोक म्हणजे कोण हा प्रकाश पडायला श्यामला वेळ लागणे स्वाभाविकच होते. त्याच्या साहेबाचे नाव Ashok J. सूडबुद्धे होते हे त्याला माहीत होते; पण ऑफिसमध्ये त्यांना सर्वजण साहेब साहेब म्हणत असल्याकारणाने आशाबाईसुद्धा त्याना साहेबच म्हणत असतील अशी त्याची खुळी समजूत होती.

श्याम हो-नाही करेपर्यंत टेलिफोनचा मंदसा बझर झाला. साहेब वा साहेबिणीच्या खोलीतले फोन खणाणत नाहीत तर बझरतात ह्याची श्यामने नोंद घेतली बाईंनी ज्या तऱ्हेने टेलिफोनवर बोलणाऱ्या माणसाला प्रतिसाद दिला त्यावरून त्यांचे बोलणे बराच वेळ चालणार असा श्यामने कयास बाधला व तो खुर्चीवर बसला.

स्त्री-मुक्ती, स्त्री-स्वातंत्र्य वगैरे करता झगडणारी ही लक्ष्मीबाई कोणा पुरुषाशी इतके हेमामालिनीसारखे गोड बोलत असेल ह्यावर श्यामचा विश्वास बसेना. टेलिफोनवर माणूस जे म्हणेल त्याला ह्या बाकी आपल्या 'हो', 'हो', म्हणत होत्या. आता त्या आवळे याच्याशी बोलत होत्या का जावळे याच्याशी ते कळायला मार्ग नव्हता. कदाचित कोणी बावळे पण असेल ! तेवढ्यात बाईंचा फोन सपला. एका गोड स्वप्नातून त्या जाग्या झाल्यासारख्या श्यामला विचारत्या झाल्या, 'yes, what do you want ?'

'भले !' श्याम मनातल्या मनात म्हणाला, 'अहो आत्ताच मी अशोककडून आलो आहे काय म्हणून विचारत होतात ना ? आणि आता हे what do you want काय?' पण तो जनातल्या जनात 'Madam, I have come from Shri Ashok J. सूडबुद्धे'

'Yes, yes, yes. How stupid of me' म्हणत बाईंनी P. A. ला टेलिफोनवर त्यांच्या केडरची seniority list घेऊन यावयास सांगितले व श्यामला जरा थाबा म्हणून सागितले. तेवढ्यात परत टेलिफोन बझरला.

आता बाई स्वतंत्र स्त्रीच्या बाण्याने बोलत होत्या, त्या अर्थी त्या कोणा महिला मंडळाच्या सेक्रेटरीशी बोलत असाव्यात असा श्यामने अंदाज केला. त्या म्हणत होत्या, 'नाही, नाही आम्ही पुरुषाचो हुकुमशाही बिलकुल चालू देणार नाही' व रागाने लाल झाल्या होत्या. श्यामला वाटले,पाच मिनिटापूर्वी लडिवाळपणे टेलिफोनवर बोलणाऱ्या ह्याच का त्या आशाबाई ?

तेवढ्यात त्याचे टेलिफोनवरचे बोलणे सपले. श्यामकडे बघत त्या म्हणाल्या, 'खरेच, ह्या बायकाचे नेतृत्व करावयाचे म्हणजे...' श्याम काय समजावयाचे ते समजला; पण म्हणाला, 'पण आपल्याशिवाय दुसरे कोण करणार ?'

बस, ह्या प्रश्नाबरोबर दिवाळीत एखाद्या भुसनळ्याला काडी लागताच जसे होते तसा बाईंचा बोलण्याचा ओघ सुरू झाला. स्त्रियांच्या प्रश्नाच्या सर्व अगावरून त्यानी श्यामला झोडपून काढले. जसा काही सर्व अत्याचाराना श्यामच जबाबदार होता. ह्या त्याच्या बोलण्याचा परिणाम इतकाच झाला की, श्यामची भीड थोडी चेपली गेली. त्या चेपा-चेपीत त्याने विचारले, 'Madam. पण तुमचे नाव आवळेजावळे कसे ?'

आता बाईंचा चेहरा खुलला. जणू काही ह्या प्रश्नाची त्या प्रत्येक माणसाकडून अपेक्षा करत असाव्यात. शेतकरी काद्याच्या, उसाच्या भावाबद्दल ज्या उत्साहाने बोलेल त्या उत्साहाने बाई श्यामला सांगू लागल्या..

सध्याकाळी श्याम घरी आला तो ओरडतच. 'राधा, अग राधा, तो तुझ्या जुळ्या नावाचा प्रश्न सुटला बरं का !'

'कोणता प्रश्न ? कोणते जुळे नाव ?' सकाळची गोष्ट संध्याकाळपर्यंत अशी विसरणे फक्त बायकांनाच शक्य होते.

आता मात्र श्याम भडकला–'कोणते नाव काय ? सकाळी आपण श्रीमती आशा आवळे-जावळेबद्दल बोललो नव्हतो ? अग, त्यांच्या माहेरचे नाव आहे आवळे व सासरचे नाव आहे जावळे ! लग्नानतरही माहेरचा अभिमान त्यांनी सोडला नाही' खरंच, मोठ्या लोकाचे मोठेपण अशा छोट्या-छोट्या गोष्टीत दिसून येते व तो राधाकडे तसाच प्रतिसाद मिळेल ह्या अपेक्षेने पाहू लागला; पण राधाचा चेहरा आपला पारदर्शक ! त्या चेहऱ्यावर ना आनंद ना अभिमान.

श्याम काही विचारणार त्याच्या आधीच राधा म्हणाली, 'अहो, अशा माहेरच्या आडनावाच्या अभिमानाला काही अर्थ आहे का ? आता माहेरचे आडनाव म्हणजे वडलाचे आडनाव. आईच्या माहेरचे नाही. बरं, आईच्या माहेरच लावलं तरी परत आईच्या वडलाचेच नाव लावणार. आईच्या आईचं नाही, बर, आईच्या आईचं...

'पुरे पुरे, आई, तुझे म्हणणे तरी काय आहे ?' श्याम कळवळून म्हणाला.

'अहो, एवढा खटाटोप करून वडलाचं म्हणजे एका पुरुषाचेच जर आडनाव लावावयाचे तर मग फक्त नवऱ्याचेच लावावे की !'

नेहमीप्रमाणे श्यामला राधाचे म्हणणे पटले. □

# 'मधुघट'

## तांब्यांच्या कवितांचा सांगीतिक आविष्कार

मराठी साहित्याइतकं आयुष्य लाभलेले जे काही मोजके कवी या भाषेत होऊन गेले त्यांच्यामध्ये कविवर्य भा. रा. तांबे यांचे नाव प्रकर्षानं घ्यावं लागेल. आपल्या सदुसष्ठ वर्षांच्या आयुष्यात या कवीने जीवनाच्या सर्व अंगांचा मनमुराद उपभोग घेतला आणि त्या भोग–उपभोगांची प्रतिबिंबं त्यांच्या कवितांमधून मराठी रसिकासमोर आजही तरळत राहतात.

१८७४ ते १९४१ हा काळ सबंध जगाच्याच दृष्टीने एक महत्त्वाचा कालखंड होता. कारण मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत या काळात अनेक परिवर्तनं घडून आली. भारताच्या दृष्टीनं तर या काळाला राजकीय इतिहासाच्या दृष्टिकोनातून फारच महत्त्व आहे; पण तांबे स्वतःच्या जीवनातील अनुभवाशी इतकं तादात्म्य पावले होते की या बाह्य वादळाचे वारे त्यांच्या कविमनाला फारसं विचलित करू शकले नाहीत.

प्रा. वा. गो. मायदेव यांना १९३३ साली लिहिलेल्या एका पत्रात तांब्यांनी स्वतःच आपल्या कवितेचा प्रवास कथन केला आहे. ते म्हणतात–

'..It is a remarkable feature of my poetry, it has grown with my life. It babbled like a child when I was below fifteen. It was licenscious in my early youth and I actually burned some of those pieces. It dwelt upon love after wedding till children sprang up round me. Then it sang of children. It became moody and pathetic when death visited my doors carrying away children. Then came out 'मध्यरात्रीच्या निवात हृदया' and the Orphans etc. Reconciliation to the realities of life brought in note and more universal character ..Now, when literary persons have dropped round me like petels of a blown rose, when disease and distress and debility have established their quarters in me; when like a canoe caught in a whirl of storm my family affairs are tossed hither and thither, is it wonder that my eyes should dwell upon the distant skirts of Life, Beyond (upon) the Great to Be? I almost hear the mellow tinkling of far away bells of a magic romantic world, far and far away beyond the bourne of time and space.'

मृत्यूपूर्वी फक्त सात-आठ वर्षं आधी लिहिलेल्या या पत्रातलं तांब्यांचं मनोगत वाचल्यानंतर प्रा. रा. श्री. जोग यांनी 'आधुनिक कवीतील सर्वांत भाग्यशाली कवी' असा केलेला त्यांचा गौरव किती यथार्थ आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल. कारण मनुष्याच्या जीवनाचा जमाखर्च त्याच्या वाट्याला आलेल्या सुख–दुःखाच्या प्रमाणावरून मांडला जात नाही, तर जीवनाचा प्रत्येक क्षण तो कसा जगला यावरून मांडला जातो. तांब्यांनी स्वतःच मांडलेला हा जमाखर्च त्यांच्या कवितांच्या संदर्भात पाहिला की असं जीवन ज्याला जगता येतं, भोगता-उपभोगता येतं तोच खरा भाग्यवान, हे मान्य करावं लागतं.

अशा या भाग्यशाली कवीच्या निवडक कवितांचा एक कार्यक्रम डॉ. अलका देव यांनी पुण्यात नुकताच सादर केला. त्यामध्ये 'पुनः पुनः यावे' किंवा 'प्रभु तुज कवणे परि ध्याऊ' सारख्या ईश्वरभक्तिपर कविता, 'तृणाचे पाते' किंवा 'गुराख्याचे गाणं'-सारख्या निसर्गकविता, 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या' किंवा 'तुज खेळ वाटली प्रीती'-सारखी प्रेमगीतं, 'नदीच्या शेजारी' किंवा 'आईकडे न्या' सारखी लहान मुलांची आणि लहान मुलाविषयी लिहिलेली कविता, तसंच 'मधु मागशी माझ्या' किंवा 'घन तमी शुक्र बघ' सारख्या लोकप्रिय कविता यांचा समावेश होता.

सुमारे दोन-अडीच तासांच्या या कार्यक्रमात तांब्यांच्या एकूण वीस कविता सादर करण्यात आल्या. कवितांचं संगीतनियोजन डॉ. अलका देव यांनीच केलं होतं आणि अरुण आपटे, श्रीकांत पारगावकर, रजनी करकरे, रंजना पेठे, प्रफुल्ल देव व स्वतः अलका देव यांनी या कविता सादर केल्या. तांब्यांच्या कवितांचं बरंचसं प्रातिनिधिक चित्र या कार्यक्रमातून उभं राहिलं. यापैकी प्रत्येक कवितेवर लिहिणं शक्य नाही. त्यामुळं त्यापैकी काही मोजक्याच कवितांची इथं नोंद घेतो.

'अजूनी लागलेचि दार' ही तांब्यांनी १९०२ साली लिहिलेली कविता. डॉ. देव यांनी ती सरळ सरळ भक्तिगीत म्हणून 'ट्रीट' केली; पण 'नववधू प्रिया मी बावरते' या तांब्यांच्याच दुसऱ्या एका कवितेप्रमाणे एकाच वेळी प्रियकर आणि ईश्वर यांची ही आळवणी असू शकेल. दोन्ही कवितामधील एकेकच कडवं घेतलं तरी याची प्रतिती होऊ शकेल.

'कळे मला तू प्राण–सखा जरि  
कळे तूच आधार सुखा जरि  
तुजवाचुनि संसार फुका जरि  
मन जवळ यावया गांगरते'  
(नववधू प्रिया मी

आणि–

'जीवित तुजवीण विफल  
का मग हा विधिचा छळ  
खचित तुझी मत्प्रीती छबि तव ही माझी'

शिवाय ही कविता बंगाली कवयित्री तोरू दत्त हिच्या बहिणीला उद्देशून लिहिलेल्या 'Still Barred thy doors' या कवितेचं मराठी रूपांतर आहे, (तांबे समग्र कविता) हे लक्षात घेतलं तर वरील मुद्दा जास्त सहज स्पष्ट होऊ शकेल.

'सखये या स्थानी' हे या सबंध कार्यक्रमात सादर झालेलं बहुधा एकमेव द्वंद्वगीत; पण प्रत्यक्षात कविता वाचली तर असं लक्षात

येईल की हे द्वंद्वगीत नाही. कारण त्यामध्ये बहुतेक सर्व ठिकाणी प्रियकर प्रेयसीला उद्देशून (अगदी शीर्षकापासून) बोलतो आहे. या संदर्भात डॉ. देव याना विचारलं असता त्या म्हणाल्या की, 'ज्या अर्थी तो तिला उद्देशून काही तरी बोलत आहे त्या अर्थी तीही तिथे उपस्थित असणार आणि त्याच्या वक्तव्यावर तिची काही तरी प्रतिक्रियाही असणार. कवितेची ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर हे द्वंद्वगीत म्हणून स्वीकारायला काहीच अडचण वाटू नये.' डॉ. देव याचं म्हणणं तर्कसंगत आहे, शिवाय कवितेत ताब्यानी क्रियापदाची रचनाही अशी ठेवली आहे की त्यावरून बोलणारा स्त्री आहे की पुरुष, याचा नीट पत्ता लागू शकत नाही. हे सर्व जरी असलं तरी काव्याच्या प्रांतात बऱ्याच वेळा प्रियकर किंवा प्रेयसीच्या अनुपस्थितीतच त्याच्याशी जास्त बोललं जातं हे या ठिकाणी लक्षात घेतलं पाहिजे. त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे–

'प्रेम तयावर होतं. तर मग तुमचं ना भारी ?'

'छे छे ! कसलं ? लेक नृपाची मी, तो व्यापारी.'

किंवा

'तुम्हि असे समजता,गुपित न तुमचे कळले
परि माणुस अमुचे मनात तुमच्या शिरले'

किंवा

'तुला न देइन माला,
जा जा चाल घराला'

किंवा

'मुशाफिर आम्ही,
आम्ही वनवासी, कशास्तव भुललिस आम्हांसी ?'

यासारखी एकाहून एक सरस द्वंद्वगीतं तांब्यानी दिलेली असताना काव्यातल्या शब्दरचनेच्या संदिग्धतेचा फायदा घेऊन किंवा विषयाच्या पार्श्वभूमीच्या आधारे एखाद्या कवितेचं ओढून–ताणून द्वंद्वगीत करण्याची आवश्यकता नव्हती. शिवाय या द्वंद्वगीताच्या बाबतीतही ताब्यांच्या कवितामध्ये असं वैविध्य आहे की ते 'तुझ्या गळा, माझ्या गळा–' सारखं बहिण–भावाचं काव्य, 'प्रेम तयावर होतं तर–' सारखा राजकन्या आणि तिच्या दासीमधला संवाद किंवा 'तुम्ही न यावे हो धन्वंतरि, जरी तापले ज्वरे–' सारखं प्रेमज्वराने दग्ध झालेली प्रेयसी आणि व्यावहारिक मात्रा उगाळणारा वैद्यबुवा यांच्यातला खटका हे सगळंच सारख्याच सुंदरपणे देतात.

अर्थात प्रा. मायदेव यांनी 'सखये या स्थानी' या कवितेचा संदर्भ स्पष्ट करणारी जी टीप लिहिली आहे ती वाचली म्हणजे कविने साध्या सरळ, निष्पाप मनाने एखादी कविता रचली असली तरी आपण वाचक तिला कसे फाटा फोडतो हे लक्षात येईल. प्रा. मायदेव तीनच वाक्यामध्ये ही टीप संपवतात–

'१९०३ साली वकिलीचे काम घेतल्यावर भास्कररावाना न्यूमोनिया झाला. नंतर ते प्रकृति सुधारण्यासाठी पंचमढीला गेले. तेथील सृष्टिशोभा पाहून ही कविता लिहिली आहे.'

कविवर्य ताब्यांच्या अनेक कविता तीन किंवा चार कडव्यापेक्षा जास्त मोठ्या आहेत. अशा कविता कार्यक्रमात सादर करताना कवितेच्या आशयाला धक्का न पोहोचू देता काही कडवी वगळणं अपरिहार्य ठरतं. डॉ. देव यांनाही काही कविताच्या बाबतीत ते करावं लागलं; पण 'मधु मागशी माझ्या सख्या परी–' या कवितेतील

'तरुण–तरुणीची सलज्ज कुजबुज
वृक्ष–झऱ्याचे गूढ, मधुर गुज
संसाराचे मर्म हवे तुज
मधु पिळण्या परी बळ न करी–'

हे कवितेतील pathos चा सर्वात उत्कट बिंदु साधणारे (अर्थात माझ्या मते) कडवंच डॉ. देव यानी हेतुतः गाळलं आणि 'नैवेद्याची एकच वाटी–' नंतर 'ढळला रे ढळला दिन सखया' अशी गाडी एकदम उतारालाच लागली.

कार्यक्रमातील एकूण वीस कवितांपैकी 'डमडमत डमरू ये' (प्रफुल्ल देव व इतर), 'घट भरे प्रवाही' (डॉ. अलका देव), 'कुरणावरती' (श्रीकांत पारगावकर) 'नदीच्या शेजारी' (रंजना पेठे) आणि 'घन तमी शुक्र बघ–' (समूह) या अर्थाचं अस्तित्व अबाधित राखून उत्कृष्ट संगीत लाभलेल्य पाच कविता ज्याची एक नवी रेकॉर्ड काढता येईल अशा !

कार्यक्रमाच्या संगीत नियोजनाविषयीही थोडंस लिहिलं पाहिजे वर उल्लेखिलेल्या पाच कवितांचं संगीत निश्चितच श्रवणीय होतं; पण त्या कविता आणि उरलेल्या कवितांना दिलेल्या संगीतामध्ये दर्जाच्या दृष्टीने असलेली तफावत जरा जास्त वाटली. संतूर (सतीश गदगकर) आणि बासरी (प्रा. अजित सोमण) यांनी दिलेले काही पीसेस उत्तम होते, पण ताब्यांच्या जातीच्या कवितेला गिटारचा वापर करण्याची खरोखरच गरज होती का, याचा मात्र विचार व्हायला हवा. यात कुठेही काव्याचा स्थल–काल, कवीचं व्यक्तिमत्त्व किंवा पौर्वात्य संगीत आणि पाश्चिमात्य संगीत असा विचार नाही; तर तांब्यांच्या कवितेची जातच अशी स्वच्छ, शांत आणि उत्कृष्ट गेयता असलेली आहे की तिथे एखादी पेटी–तबला, फार तर व्हायलीन पुरेसं आहे. गिटारच्या कॉर्डस्नी या कवितेला उठाव देण्याची आवश्यकता मला तरी वाटत नाही; पण लयीच्या दृष्टीने आपल्याला गिटारची गरज वाटल्याचं डॉ. देव यांनी या संदर्भात बोलताना सांगितलं.

'जन पळभर म्हणतील', 'मधु मागशी', 'घन तमी शुक्र बघ', 'तिन्ही साजा सखे' यासारख्या ताब्यांच्या लोकप्रिय कविता (लता मंगेशकरानी केलेल्या) त्याच चालीमध्ये ऐकायला मिळतील, या अपेक्षेने जे श्रोते या कार्यक्रमाला आले असतील त्यांची इथे निराशा झाली असेल; पण मराठी कविता सादर करण्याचा एक प्रामाणिक प्रायोगिक प्रयत्न म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिल्यास थोडंसं साहस दाखवून डॉ. देव यांनी सादर केलेला हा कार्यक्रम खचितच श्रवणीय होता !

□

कार्यक्रमानंतर डॉ. देव याची अशा तऱ्हेचा प्रयोग करण्यामागील भूमिका समजावून घेण्यासाठी मुद्दाम भेट घेतली. त्या वेळी बोलताना त्या म्हणाल्या, 'तांबे हे माझे आवडते कवी आहेत आणि यापूर्वी इंदोरला मी तांब्यांच्या काही कविता अशाच तऱ्हेने सादर केल्या होत्या. अर्थात त्या सर्व मी एकटीनेच सादर केल्या. या वेळी पुण्यातल्या काही तरुण कलावंतांच्या सहकार्याने केलेला हा सामूहिक प्रयत्न आहे.

'सिनेगीतं किंवा निरनिराळ्या कवींच्या रेकॉर्डसमुळे लोकप्रिय झालेल्या कविता ऑर्केस्ट्राच्या साह्याने जशाच्या तशा सादर करणं हा हल्ली एक व्यवसायच झालेला आहे; पण रेकॉर्डस न निघालेल्याही अनेक कविता अप्रतिम आहेत. अशा कविता मराठी रसिकासमोर याव्यात आणि त्या कार्यक्रमानाही

विशिष्ट व्यावसायिक दर्जा प्राप्त व्हावा, हा या प्रयोगामागील मुख्य उद्देश आहे.

'कविता सादर करताना तांब्यांच्या काव्यातील सर्व प्रकारचे रस श्रोत्यांसमोर साकार व्हावेत अशी माझी इच्छा होती. कवितांची निवडही त्याच दृष्टिकोनातून केलेली आहे. कार्यक्रमात ईश्वरभक्तीपर, प्रेम, निसर्ग, बालगीतं असे या कवितांचे bunches करून एकत्रितपणे सादर करण्याचे कारण कोणत्याही कवितेमुळे विशिष्ट मूड निर्माण होत असतो. त्या मूडच्या तीन–चार कविता एकापाठोपाठ एक अशा तऱ्हेने म्हटल्यामुळे हा मूड काही अंशी तरी पकडता येतो. अन्यथा तो निर्माण होताहोताच विरूनही जातो. एकूणच हा कार्यक्रम तयार करताना आम्ही thematic appraach ठेवला होता.

तांब्यांच्या 'मधु मागशी' किंवा 'तिन्ही सांजा' सारख्या लोकप्रिय कवितांना स्वतंत्र नवीन चाल देण्याच्या प्रयोगाबद्दल विचारलं असता डॉ. देव म्हणाल्या, 'माझं असं स्पष्ट मत आहे की या कवितांना सध्या दिलेल्या चाली त्या कवितांमधील स्थायी भावाशी विसंगत आहेत. म्हणून मी तो भाव लक्षात घेऊन त्याला अनुरूप चाली दिल्या आहेत. कोणालाही म्हणता येतील अशा सोप्या केल्या आहेत. आणि माझी कशी खात्री आहे की, या चालीही मी श्रोत्यांच्या कानांवर व मनांवर बिंबवू शकेन.

'या कार्यक्रमानंतर गालीबच्या गझला, मीराबाईच्या रचना, तसंच प्रसिद्ध कवी कुसुमाग्रज यांच्या काही कवितांचा कार्यक्रम सादर करण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

'अर्थात हे सर्व करत असताना आर्थिक मुद्दा सतत भेडसावत असतोच. 'मधुघट' साठी मी स्वतःचे काही पैसे घातले, अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनीही आर्थिक सहाय्य केले; पण अशा तऱ्हेने व्यक्तिगत पातळीवर आपण किती काळपर्यंत पुरे पडणार? त्यासाठी साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थांनी असे कार्यक्रम स्पॉन्सर केले पाहिजेत. 'मधुघट' चा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आम्हा सर्व तरुण कलावंतांबरोबरच माझे वडील पंडित राजाभाऊ देव यांनी हरप्रकारचे कष्ट घेतले, याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे.'

काव्य आणि संगीताच्या क्षेत्रात नव्या वाटा शोधण्याची धडपड डॉ. देव यांच्या बोलण्यातूनही व्यक्त होत होती. कवींनी आपल्या कविता स्वतःच सादर करणं हा प्रकार फार जुना आहे; पण एखाद्या तरुण समूहाने संगीताच्या साथीने कविता सादर करण्याचा प्रयोग अजून फारसा रुजलेला नाही. (ऑर्केस्ट्रावाले सोडून) त्या दृष्टीने 'मधुघट' च्या कार्यक्रमाचं स्थान निश्चित महत्त्वाचं आहे.

□

गेल्या चार-पाच वर्षात पुण्यात अशा तऱ्हेचे आणखी दोन कार्यक्रम मी पाहिले होते. प्रसिद्ध संगीतकार भास्कर चंदावरकर यांनी आरती प्रभू (कै. चि. त्र्यं. खानोलकर) यांच्या निवडक कविता 'नक्षत्रांचे देणे' या कार्यक्रमाद्वारे सादर केल्या होत्या. संगीताच्या दृष्टिकोनातून या कार्यक्रमाचा दर्जा तर चांगला होताच; पण कविता सादर करणाऱ्यांमध्ये अमोल-अनुया पालेकर, मोहन गोखले, माधुरी पुरंदरे, रविंद्र साठे अशी मातब्बर मंडळी होती. या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे कविता सादर करणाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर एका बाजूला कवटी आणि दुसऱ्या बाजूला हिरव्यागार वृक्षाचं प्रतीक उभं केलेले होतं. (मरणजीवन) तसंच काही कवितांच्या वेळी मागच्या पडद्यावर स्लाइडसही दाखवल्या जात होत्या. या स्लाइडसमुळे जरी श्रोत्यांचं लक्ष मूळ कवितेपासून दूर जात होतं तरी सर्वसाधारणपणे कार्यक्रम प्रभावी झाला होता.

अशा प्रकारचा दुसरा एक कार्यक्रम गेल्याच वर्षी प्रा. सौ. श्यामला वनारसे यांनी सादर केला. प्रसिद्ध साहित्यिक कै पु. शि. रेगे यांच्या काही कविता, त्यांच्या कादंबऱ्यांमधले काही तुकडे प्रा. वनारसे यांनी नृत्य आणि संगीताच्या माध्यमाने सादर केले. हा प्रयोग 'प्रेक्षणीय' जास्त होता. रेग्यांची कविता श्रोत्यांपर्यंत पोचवण्याचा हेतू त्यातून किती प्रमाणात साध्य झालेला असेल याविषयी मात्र शंका आहे.

डॉ. अलका देव यांनी सादर केलेला 'मधुघट' हा अशा प्रयोगशील कार्यक्रमांपैकी तिसरा कार्यक्रम. (इथे 'मंतरलेल्या चैत्रबनात' किंवा तत्सम कार्यक्रमांची दखलही घेण्याचं कारण नाही. कारण ते मराठी गीतांचे धंदेवाईक ऑर्केस्ट्रा आहेत.)

या तिन्ही कार्यक्रमांमध्ये अनेक गुण आहेत व काही सुधारता येण्यासारखे दोषही आहेत; पण या कार्यक्रमांनी काव्य आणि संगीताच्या प्रांतात एका नव्या प्रयोगशीलतेला चालना दिली हे त्यांचं सर्वात मोठं Contribution आहे. अशाच तऱ्हेने आणखी चार मराठी कवींच्या कवितांचे कार्यक्रम उभे राहिले तर एक उत्कृष्ट 'काव्यसप्ताह' रंगवता येईल. आदल्या दिवसाची रात्र डोळ्यांवर तरंगत असतानाच पुढल्या दिवसाची पहाट होऊन जाईल!

— सतीश कामत

तै कष्ट तै सायास !



पण जरूरीच काय? 'केप्र' उत्पादने
अगदी घरच्यासारखीच असतात!
मसाले, लोणची, पापड, चटण्या, भाजण्या इ. अनेक प्रकार
केशवलक्ष्मी प्रसाधन
कन्या शाळेजवळ. शनिवार. पुणे-३०
RAAS/

डॉक्टर्स संपावर गेले आहेत अजून सुरतला संप वा आंदोलन सुरू झालेले नाही; पण सुरत या हवेतून बचू शकेल असे मला वाटत नाही.

विद्यार्थी रीले मूक हरताळ करतात म्हणे. हा फास्ट नसून फार्स वाटतो. आपला मिलिंद त्यात आहे. टरं जेवून जायचे व मग उपास सुरू करायचा! भूक पुन्हा लागेस्तोवर दुसरा तुम्हाला सोडवायला येतोच.

बिचारे विद्यार्थी उपास करून थकले–भागले असतील म्हणून चोरघडे व मी एका तंबूवर गेलो. तेथे तीन विद्यार्थ्यांच्या जोड्या गुलगुल गप्पा मारीत होत्या. हे दोघे कोण उपटसुंभ आले असे त्यांना वाटले. आम्हालाच शरम वाटली व आम्ही तेथून त्यांची माफी मागून सटकलो. हा रिले फास्ट!

आपल्या वेळी असला प्रकार नव्हता.

हे लोक संपावर गेले आहेत. रोग्याचे काय होईल हीसुद्धा त्यांना चिंता नाही.

काय हा बेजबाबदारपणा!

## सत्तावीस जानेवारी

काँग्रेस आयचा एक डॉक्टरमित्र व मी जोरजोरात चर्चा करीत आहोत. हा प्राणी सध्या व्हीप आहे गांधीनगरातील विधानसभेत. त्यामुळे विरोधी व सत्ताधारी पक्षाचा सतत संपर्क येत असतो. 'काहीही म्हण, पण धाडकन मेडिकल कॉलेजे सहा महिने बंद करण्याचा तुझ्या सरकारचा निर्णय शुद्ध मूर्खपणाचा आहे!' मी त्यास सुनावतो. हे विद्यार्थी जणू शत्रू आहेत अशा सूडबुद्धीने घेतलेला हा निर्णय आहे, हे माझे प्रांजल मत मी त्यास सुनावतो.

'नाही बाबा, नाही. हा निर्णय घेणे सरकारला भाग पडले.'

'काय गप्पा मारतोस?'

'तुला मी तारीखवार घटना सांगू शकेन. पाच जानेवारी डिरेक्टरचे ऑफिस १५० विद्यार्थ्यांनी जाळून टाकले. तेथील स्टाफला मारले आणि त्याची गाडी तोडून टाकली. त्याचा बचाव करू शकशील? पुढे बारा जानेवारीस हायजॅक केली, धरणे धरले, प्रतीक देखावा ऊर्फ शो केला. धमाल सुरू होनीच. खिडक्यांच्या काचा तोडल्या, नोटीसबोर्डस् फाडून टाकले. १५० विद्यार्थी नायीबाई म्यु. कॉलेजात शिरले रस्त्यात उभे राहून घोषणा दिल्या व लुटालूट केली!'

'पण यांना दलितांनी चिडविले म्हणून ही प्रतिक्रिया झाली ना?'

'नाही, दलितांचा उपवास सतरा जानेवारीस सुरू झाला, म्हणजे हे प्रकार पाच दिवस आधी सुरू झाले होते. साहजिकच, हरिजन विद्यार्थ्यांनी सभा घेतल्या व सवर्ण मुलांचा निषेध केला. त्याची प्रतिक्रिया म्हणून सवर्ण विद्यार्थ्यांनी आरोग्यखात्याच्या गाड्यांचे नुकसान केले व दोन जीप्स जाळल्या!'

'तुझी माहिती खोटी आहे. नीट चेक कर. दलितांनी मोर्चे आणले, सवर्णांना चिडविले व म्हणून चिडलेल्या जमावाने हे नुकसान केले.'

'असेल, पण १७ जानेवारीस ३०० सवर्ण विद्यार्थ्यांनी बस पळविण्याचा प्रयत्न केला हे तर सत्य?'

'हे सत्य.'

'जानेवारी एकवीस. आता हे विद्यार्थी जास्त धीट झाले व पिकेटिंग सुरू झाले. स्टाफ व विद्यार्थी, या दोघांना या नेत्यांनी कॉलेजात जाऊ दिले नाही. कँपसचे वातावरण त्यामुळे दूषित झाले.'

'पण हरिजन विद्यार्थ्यांनी ह्या पोरांवर दगड मारले!'

'आता तू तारखा चेक कर. ही घटना बावीस जानेवारीची. या दिवशी संघर्ष सुरू झाला सवर्ण व अवर्ण यांच्यामध्ये. चोवीस तारखेपर्यंत हा संघर्ष मेडिकल कॉलेजच्या आजूबाजूस पसरला. हरिजनवस्त्यांत भीतीचे वातावरण होते. सवर्ण आता रॉकेल छाटून बसेस जाळत होते.'

'सवर्ण नाही, गुंड लोक! तुम्ही राजकारणी अकारण यास कास्ट वॉरचे स्वरूप देत आहात.'

'तुला नकोसे वाटेल तेव्हा गुंड! आणि फायद्याचे वाटेल तेव्हा हरिजनांवर आळ!'

'पण गुंडांना जात असते का? ते मुसलमानदेखील असू शकतात. आर्योदय जिनिंग मिलवर स्फोटक पदार्थ टाकले ते काय मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी? ते गुंडांचे काम. दुकाने कोणी लुटली? दिवे कोणी तोडले? टेलिफोनच्या तारा कोणी कापल्या?'

'म्हणून चारापेक्षा जास्त लोकांनी जमायचे नाही असा हुकूम काढला आम्ही. अश्रुधूर जमाव दिसला तर वापरा अशी ऑर्डर निघाली. सव्वीस जानेवारी पवित्र दिवस; पण अहमदाबादेत छत्तीस अश्रुधुराचे शेल्स फोडले. बऱ्याच व्यक्ती घायाळ झाल्या!'

'कारण तुम्ही लोकांनी गोळीबार केला!'

'मग काय हात जोडून त्यांना नमस्कार करायचा? आणि आरत्या ओवाळायच्या?' व्हीपचा प्रश्न.

'कर्फ्यू पुरा नव्हता वाटतं?'

'नाही, म्हणून धाक दाखविण्यासाठी फायरिंग करणे भाग पडले. विद्यार्थी संपावर गेले होते. कॉलेजे ओसाड पडली होती. तोफान चालू होते. लॉ–अँड ऑर्डर धोक्यात होते. साहजिकच, गोळीबार करून लोकांना धाकात ठेवणे आवश्यक होते. आम्ही मेडिकल कॉलेजे सहा महिने बंद ठेवली त्याच्या पाठीमागील ही पार्श्वभूमी आहे. तुम्ही लोक नाही मानणार! ठीक आहे.'

'ईस्ट इज ईस्ट अँड वेस्ट इज वेस्ट!'

'क्या करेगा, दुर्दैव–'

## एकतीस जानेवारी

'क्यू कासमभाई, कहाँ चले ?'

'आता थांबायला मला वेळ नाही, मी उद्या भेटतो.' कासमभाई भलतेच घाईत दिसल.

डॉक्टर नशीबवान असतात. सर्व धर्मांचे व सर्व तऱ्हेचे लोक त्यांच्याकडे चालत येतात. तुमची इच्छा असो वा नसो, तुम्हाला त्यांची व्यथा ऐकावयास मिळते. मी तर सर्वांत नशीबवान आहे. मंत्र्यांपासून संत्र्यांपर्यंत मला ही व्यथा ऐकण्याची संधी आपोआप मिळते; पण त्यात मला बरेच चागले साहित्य हाती लागते, अचानक, अनपेक्षित.

हा कासम दुसऱ्या दिवशी तणतणत आला. मोठ्या आशेने हरिजन-पुढाऱ्यांकडे गेला होता. 'हरिजन-मुस्लिम भाई-भाई' अशी त्याची स्ट्रॅटेजी होती. आमच्या वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्यांनी मला ही टीप हे आदोलन सुरू झाले त्याच वेळी दिली होती. त्याचा पडताळा महिन्यानंतर हाती आला.

या वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्याची गणिते पुढीलप्रमाणे होती– वीस टक्के हरिजन व दहा टक्के मुसलमान एक झाले तर सवर्ण लोकांना भारी पडून जाईल. ज्यास 'एलाइट क्लास' म्हणतात तो दहा ते बारा टक्के आहे. त्यातील अर्धे लोक मतदान करीत नाहीत. म्हणजे राजकारणाच्या दृष्टीने त्याची संख्या अर्धीच धरायची.

कासममिया बोलताना बोलून गेले, हरिजन ते हरिजन. फॉडर म्हणून चागला उपयोग होईल. आपल्या दुप्पट संख्या आहे. नेतृत्वासाठी त्याना मुसलमानावरच अवलंबून रहावे लागेल. त्याची स्वत.ची तेवढी कुवत नाही. अवर्ण किंवा दलित व मुसलमान एकत्र झाले तर सवर्णांना भरडून काढता येईल, पर्मनंट भारतावर राज्य करता येईल, काही हरिजनांना मुसलमानही करता येईल–कासममियाचे प्रकट चिंतन मला चिंताजनक वाटत होते. मुसलमान चागले स्ट्रॅटेजिस्ट आहेत असे इतिहास सागतो. कोण जाणे, ही त्याची स्ट्रॅटेजी सफलसुद्धा व्हायची !

## चार फेब्रुवारी

काल रात्री मी डी. एस. पी. ला भेटलो म्हणून बरे झाले. 'लालवानी स्टोरी' मी 'कॅरव्हान' मासिकात लिहिली व त्यांत त्याचा रोल मी यथार्थपणे रंगविला. ती भूमिका आता उपयोगी पडली.

आदोलनामुळे वातावरण तंग आहे. त्यामुळे चारापेक्षा जास्त लोकाना जमण्याची बंदी आहे. डी. एस. पी. नी जर आम्ही मोर्चा काढला तर पकडण्याची तयारी ठेवली होती; बसेसही तयार ठेवल्या होत्या.

'डॉक्टरावर तुमचा विश्वास नाही का ? एवढे सिनियर डॉक्टर्स–ते दंगा करतील असं का वाटतं ?'

'नाही, तसं नाही.'

हो–ना करता आम्हाला कलेक्टर व डी. एस. पी. यांनी मोर्चास परवानगी तर दिली. कोणी दंगा केला तर जबाबदारी तुमची असं जेव्हा ते म्हणाले तेव्हा आमच्या मेडिकल युनियनच्या अध्यक्षाची झोपच उडाली.

आज आमचा शांततामय मोर्चा कसा छान निघाला.

घोषणा नाहीत, आवाज नाही, फक्त मूक मोर्चा !

कलेक्टर व डी. एस. पी. एकदम खूष झाले.

'आम्हाला वाटलं होतं, कोणी दगड मारेल !' कलेक्टर म्हणाले, 'आणि मग धमाल सुरू होईल. कारण डॉक्टराबरोबर वकील, आर्किटेक्टस्, व्यापारी वगैरे सर्व व्यवसायी मंडळी होती, आणि शाळेची मुले. आम्हाला खात्री नव्हती हा शांततापूर्ण मोर्चा निघेल व यशस्वी होईल. अभिनंदन!'

'थँक्यू.'

आज आमचे मेडिकल युनियनवाले कसे खुषीत आहेत.

एक निराळीच नशा दिसते त्यांच्या चेहऱ्यावर. पुढारीपणाचा आनद.

विजयाचे समाधान.

## पाच फेब्रुवारी

काय वृत्तपत्रे बेकार आहेत !

कालचा शांततापूर्ण मोर्चा एवढा यशस्वी झाला.

सर्वांना वाटले, मोठ्या मथळ्याने आमची बातमी येणार, फोटो छापून येणार. पण कुछ नाही!

का हा अन्याय ?

टाइम्सने तर त्याची दखल देखील घेतली नाही !

गुजराथी लोकसत्तेने बातमी दिली आहे–इवलीशी.

सारे डॉक्टर्स गरम-गरम झाले आहेत.

बिचारे डॉक्टर्स ! पहिल्यादाच आदोलन करीत आहेत. सारेच नवीन आहे. खूप उत्साह आहे, पण वास्तव जगापासून सारे कसे दूर आहेत. कल्पना नाही, राजकारण कसे खेळतात. आपण खूप मोठे आहोत असे सर्वांना वाटते. पेपरवाल्यांनी भाव दिला नाही म्हणून खट्टू झाले आहेत.

पेपरवाले महा असतात !

कोठे सागत फिरू हे सर्व ?

आणि ह्या डॉक्टरमंडळीना पटले पाहिजे पुन्हा.

त्याना वास्तवतेची कल्पना नाही.

अतिशयोक्तीच वाटेल.

अनुभव येईल तेव्हा कळेल !

उगाच सांगून वाईटपणा कशाला घ्यायचा ?

प्रचीती आली की मग आपल्याकडे धाव घेतात, 'तुमची प्रेसमध्ये ओळख आहे, जरा पहा ना, एवढे उद्या जरूर छापून आले पाहिजे !'

आपणही भाव खाऊन घ्यावा ! अनायासे मिळतो आहे !

'हा, हा, हो जायेगा, डरना मत!' असे फुकटचे आश्वासन द्यायला काय जाते ?

## सात फेब्रुवारी

'ओ भाय, आता कार्यक्रम लौकर सुरू करा. तासभर उशीर झाला आहे. ' मी माझ्या सहकाऱ्यांना सांगतो. वैदिक ब्राह्मणाचा सत्कार-समारंभ नाशिकच्या ब्राह्मणसभेतर्फे बडोद्यात आयोजिला आहे. अडवलपालकर प्रमुख पाहुणे, ललितभाई मगनभाई पटेल हे संयोजक आहेत. महाजन, लेले, प्रा. अग्निहोत्री, डॉ. डोंगरे वगैरे मंडळींचा यात पुढाकार आहे. मी नाशिकच्या मध्यवर्ती संस्थेचा उपाध्यक्ष आहे.

'पण अजून डोंगरेमहाराजांचा पत्ता नाही. शंकराचार्य देखील आले नाहीत. कार्यक्रम कसा सुरू करणार ?'

'मी एस. पी. कडून आत्ता येत आहे. डोंगरेमहाराज येणार नाहीत. नडीयादमध्ये धमाल चालू आहे. ते कसे येतील ?'

'पण शंकराचार्य तर आले पाहिजेत ?'

'हूं, काही तरी तर कार्यक्रम सुरू करा !'

'गोष्ट खरी. डी. एस. पी. काय म्हणतात ?'

'रावपुऱ्यात कर्फ्यू आहे. हा जनता कर्फ्यू आहे. लोक रावपुऱ्यात जाळपोळ करतील म्हणून तेथे कडक बंदोबस्त आहे. वायरलेसच्या गाड्या आणून ठेवल्या आहेत.'

'या दांडिया बाजारात धमाल होईल असे वाटते ?'

'धमाल होणार नाही, पण लोकांची मनःस्थिती नीट नाही. आणखी उशीर केलात तर लोक उठून जातील. त्याने गडबड सुरू होईल. आपला कार्यक्रम यशस्वी झालाच पाहिजे! बडोद्यात पुन्हा पचवीस वर्षे आता असा कार्यक्रम होणार नाही !'

'सुरू करतोच.'

प्रमुख पाहुणे वर व्यासपीठावर जाऊन बसले. पाच वैदिक ब्राह्मणांना उजव्या बाजूस बसविण्यात आले. एवढ्यात शंकराचार्य आले. द्वारकेच्या शंकराचार्यांना गुजराथमध्ये खूप मान आहे सर्वांचा जीव भांड्यात पडला. कार्यक्रम एकदम यशस्वी झाला. सर्वांना फार पसंत पडला. वसंत गाडगीळांचे संस्कृतमधील भाषण बहोत बढिया होते !

## आठ फेब्रुवारी

बडोद्यात आम्ही परवा शांतिपूर्ण मोर्चा काढला. तो अत्यंत यशस्वी झाला. ते यश पाहून आम्हाला कलेक्टरानी बोलावले व विचारले, 'हेल्थ सेक्रेटरी माझे मित्र आहेत. त्यांच्याशी बोलणी करायला तुमची हरकत आहे काय ?'

'पण त्यांनी आमच्या मेडिकलच्या विद्यार्थ्यांना फार उद्धटपणे वागविले होते. आमची मुले त्यांच्यावर फार रागवली आहेत.'

'मुलांचे सोडा. आणि जे झाले ते होऊन गेले. ते मी काहीच दुरुस्त करू शकत नाही; पण तुमच्याशी ते चांगल्या रीतीने वागतील याची मी हमी देतो !'

'बघू या, तुम्ही म्हणत असलात तर आम्ही गांधीनगरास जायला तयार आहो.'

त्यांनी फोन करून दयाळ या हेल्थसेक्रेटरीशी आमची भेटीची वेळ ठरविली. त्यांचे मंत्री आमच्या ओळखीचे होते.

सनत मेहता या आमच्या बडोद्याच्या पुढाऱ्यांना फोन केला. त्यांची पत्नी आमच्या एका कुटुंब नियोजन मंडळाची अध्यक्षा. त्यामुळे आम्ही त्यांच्याकडेच उतरणार होतो व दुसऱ्या दिवशीचे जेवण घेणार होतो. सनत व मनोहरसिंगजी हे हृदयस्थ कठस्थ मित्र !

आम्ही तिघे डॉक्टर्स बडोद्याहून सरळ सनतभाईंकडे गेलो. जायच्या आधी अध्यक्ष डॉ. शेठ यांना चार-पाच फोन आले होतेच, 'तुम्ही कोणाला विचारून ही बोलणी करायला जात आहात ? पहा, सरकार तुम्हाला बनवेल. तुमच्यापैकी एक–डॉ. भास्कर व्यास– सरकारचा माणूस आहे, सांभाळून असा !'

प्रत्येकास मोठे असावेसे वाटते.

ती संधी मिळाली नाही की ईर्षा व एकमेकांचे पाय खेचणे.

पुरुषाचा हा स्पोर्ट अँड पास टाइम आहे. नाइलाज आहे.

दयाळांशी तर आमची उत्तम बोलणी झाली. त्यांचे व आमचे दृष्टिकोन जमत होते. राखीव जागा संपूर्णपणे काढा, ही मागणी मान्य करणे सरकारला शक्य होणार नाही हे दयाळांप्रमाणे आम्हालाही मान्य होते.

नंतर दयाळ व आरोग्यमंत्री यांच्याशी आम्हा तिघांची पुन्हा बोलणी सुरू. आरोग्यमंत्री जाडेजा तर अफलातून माणूस ! खुल्लं-खुल्ला व खानदानी !

आम्ही सुचविलेला एक फॉर्म्युलाही त्यांनी मान्य केला.

त्यांची वागणूक, बोलणे–चालणे आम्हाला खूप आवडले. 'माफ करा, आम्हाला मुलांनी आपल्या दोघांच्याविरुद्ध रिपोर्ट दिला होता. त्यामुळे आम्ही भीतभीतच आलो होतो.'

'कसला रिपोर्ट ?'

'दयाळांनी मुलांना बसायला खुर्च्याही दिल्या नाहीत. त्यांना गेट आउट म्हटले ! आणि आपण दारू पिऊन त्यांच्याशी बोलत होतात !'

'कल्पना करा तुमच्या लहान केबिनमध्ये एकदम पचवीस लोक शिरले तर त्या सर्वांना मी एकदम खुर्च्या कोठून आणणार ? आणि खूप समजावले तरी तासभर त्या त्याच मुद्द्याचा खल चालला होता. मला इतर कामे होती. म्हणून मी त्यांना म्हटले, आता मला इतर कामे आहेत ती मला करू द्या !' दयाळांनी आपली बाजू स्पष्ट केली.

'आणि रात्री साडेबारा वाजता खरे म्हणजे मी थकून गेलो होतो, म्हणून एक ट्रांकपिलायझरची गोळी घेतली होती. त्यामुळे झोप येत होती. मुलांचा गैरसमज झाला–' आरोग्यमंत्री म्हणाले.

आम्ही खूप हसलो.

एकदा मन कलुषित झाले की साऱ्या गोष्टी विकृत दिसायला लागतात. सारे वाईटच दिसायला लागते.

आमचा फॉर्म्युला मुलांकडून पास करवून घ्यायचा होता.

मुलांचे प्रतिनिधी अहमदाबादेतच होते. ते बसने वाडिलाल हॉस्पिटलमध्ये आले होते.

अहमदाबाद ते गांधीनगर व गांधीनगर ते अहमदाबाद आम्ही

मुलाना घेऊन आरोग्यमंत्र्याशी बातचीत केली. इतर मुलांशी चर्चा करून आम्ही आपणास सागतो असे मुले म्हणाली. इतराशी चर्चा करायला ती अहमदाबादेस गेली व परत रात्री तीन-साडेतीन वाजता गाधीनगरला परतली. मध्यरात्री कुठे त्रास द्यायचा म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही आरोग्यमंत्र्यांना त्याच्या घरी गाठले. फॉर्म्युला नक्की झाला. यश मिळाले म्हणून आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला. तसेच लगबगीने अकरा-साडेअकरा वाजता बडोद्यास आलो.

येताना कंपनी होती अर्थमंत्र्याची ! साडेअकरा वाजता त्याची बडोद्यात कसलीशी मीटिंग होती. त्यामुळे त्याच्याच गाडीतून आम्ही बडोद्यास आलो.

आल्यावर एक पत्रकार मित्र भेटला. त्यास सारा 'ऑफ द रेकॉर्ड' वृत्तात दिला. त्याचे एक इंग्रजी सायंदैनिक आहे. त्याला बजावले होते, मी हे सारे 'ऑफ द रेकॉर्ड' आहे. माझ्या दोन सहकाऱ्याची लेखी परवानगी असल्याशिवाय हे छापू नकोस ! त्याने मला वचन दिले.

वचन पाळले तर तो पत्रकार कसला ?

त्याने सायंकाळच्या त्याच्या पेपरात ठळक मथळे देऊन सारे छापून टाकले !

आणि तो टाईम बाम्ब ठरला!

मुले भयंकर भडकली.

'ऑफिशिअली तुम्ही अहमदाबदेस कसे गेलात, आम्ही तुम्हाला सागितले होते की अपमान करणाऱ्या सरकारच्या प्रतिनिधीशी चर्चा करायची नाही. तुम्ही गेलातच का ?' मुलांच्यात मारामाऱ्या सुरू झाल्या.

दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रातून छापून आले, एका इंग्रजी वृत्तपत्रात जी बातमी आली होती ती साफ खोटी आहे ! मुले गाधीनगरला गेलीच नव्हती !

मुलाचे समाधान झाले.

आता ती त्या लंगोटीपत्राच्या सपादकावर चिडली. त्याने खोटे वृत्त छापलेच का ? जाळून टाका त्याचा प्रेस !

तो पत्रकार पाया पडत आला. 'बचाव, मुझे बचाव !' त्याला सांगितले, 'आम्ही तुला सागितले होते, हे वृत्त छापू नकोस ! का छापलेस ? भोग त्याची फळे. नाही तर माग माफी मुलाची !'

'पण मुले अहमदाबादेस तर गेली होती ना ?' त्याने विचारले.

'मूर्खा, तुझ्या बातमीमुळे मुलात फूट पडली. आमचा फॉर्म्युला त्यांनी नाकारला. राखीव जागाच साऱ्या राज्यातील मेडिकल कॉलेजातून नष्ट करा अशी मागणो त्यांनी पुन्हा केली आहे. तुझ्या खोडसाळपणामुळे एक चांगला प्रयत्न वाया गेला ! तुला काही अक्कल आहे का ?'

'मला फार दु ख वाटते !'

'तसे मुलांना साग !'

'बघतो.'

¤

नंतर कळले, या पत्रकाराने मुद्दाम ही खोडी काढली होती. ज्यांना गाधीनगरास जायला मिळाले नाही त्यानी पाणी चढविले होते त्यास.

आणि रोटरीक्लबात मी त्यास पूर्वी खूप विरोध केला होता.

'आव मेरे अगनमे' असे म्हणून त्याने आमच्या पदरी यश मिळू नये अशा बेताने बत्ती लावली होती.

उगाचच स्त्रिया बदनाम झाल्या आहेत असूयेबद्दल. आम्हा पुरुषातच एवढा मत्सर भरलेला आहे की स्त्रिया परवडल्या !

मुलानी 'पुनश्च हरिः ओम्' म्हणून आदोलन जास्त उग्र करायचे ठरविले आहे

आमच्या तोंडातला समाधानाचा व विजयाचा घास आमच्या एका पत्रकारबंधूने बुद्धया काढून घेतला होता.

रागापेक्षा आम्हाला विषाद व दया वाटत होती त्या मित्राची.

कारण, त्या लहान कृत्याची किंमत आम्ही जाणून होतो.

'दोस्ता, तू काय करीत आहेस हे तुला ठाऊक नाही रे !' आम्ही दु.खाने मनातल्या मनात म्हणालो.

आपण वैदिक सत्कारानिमित्त 'मृच्छकटिक' हे संस्कृत नाटक आरामात पहावे.

## नऊ फेब्रुवारी

'काय पटेल, तुमची चळवळ काय म्हणते ?' मी एका ज्युनियर डॉक्टरला विचारतो.

'आता कंटाळा आला. तुम्ही सागितलेला फॉर्म्युला स्वीकारायला आता आम्ही तयार आहोत; पण सरकार आता तेवढेही द्यायला तयार नाही !'

'तुम्ही तुमची बस चुकला आहात.'

'कबूल, बरोबर टायमाला गोष्टी कराव्या लागतात; पण आणखी जरा ताणून धरावे असे आम्हाला वाटले. त्यामुळे आणखी जास्त सवलती मिळतील अशी आम्हास आशा वाटत होती'

'मग ?'

'आता पटते, ती आशा व्यर्थ होती. हाव होती.'

'सरकारने एक मुद्दा पकडून धरला होता. तुम्हाला कळायला पाहिजे होते, सरकार तो मुद्दा सोडणार नाही !'

'खरं आहे, आता मेडिकलचे विद्यार्थी व ज्युनियर डॉक्टर्स यांच्यात दुराभाव निर्माण झाला आहे विद्यार्थी अजून दृढ आहेत. ज्युनियर डॉक्टराचा पेशन्स संपला !'

'साहजिकच आहे, डॉक्टर झाल्यावर आपण खूप रोगी रोज तपासावे, त्याना बरे करावे व त्याचे आशीर्वाद घ्यावे असे वाटत असते. इथे तर रोग्याच्या तुम्ही शिव्या खात आहात !'

'अगदी खरे.'

'परवा मी एक डीहायड्रेशनचे मूल सरकारी हॉस्पिटलमध्ये धाडले. गरिबाचे होते. ग्लुकोजमलाइनच्या बाटल्या परवडल्या नसत्या त्याला प्रायव्हेटमध्ये; पण तुमचा संप चालू होता. त्याला त्यांनी अॅडमिट केले नाही; म्हणून आय. डी हॉस्पिटलमध्ये धाडले; पण ते मूल तेथे वाचू शकले नाही. उशीर झाला होता. हे पाप कोणाच्या माथी ? माझी खात्री आहे, हा संप नसता तर हे मूल वाचले असते.'

'आम्हाला आमची चूक कळून आली आहे, आता आम्ही बहुतेक

माघार घेणार आहोत.'

'पण कोणत्याही अटीवर ?'

'हे, सरकार म्हणेल त्या अटीवर !'

'अरेरे, हे बरोबर नाही !'

'काय करणार ?'

## दहा फेब्रुवारी

काय स्पोर्ट आहे !

गल्लीत साऱ्या पोरानी जमायचे. हमरस्त्यावर कर्फ्यू आहे. गल्ली-बोळात कुठला आलाय कर्फ्यू ?

चार-पाच पोरे मनाचा हिय्या करून हमरस्त्यास अगदी जवळ अशा बोळाच्या तोंडाशी जमतात. हमरस्त्यावरील एस. आर. पी. चे जवान ओरडतात, 'अंदर जाव !'

'अंदर जाव ! –' ही तोंडाशी असलेली पोरे मोठ्याने ओरडतात.

'बकवास मत करो !'

बकवास मत करो ! !' प्रतिध्वनी.एस्. आर. पी. किंवा बी. एस् एफ. चे शिपाई फार गरम होतात. हमरस्त्यावर त्याचे राज्य असते. हमरस्ता निर्मनुष्य आहे, त्याचे श्रेय आपल्याला, अशा गुर्मीत व मस्तीत असणाऱ्या या जवानाना हा प्रतिध्वनी कसा आवडणार ?

पण हमरस्त्यावरील पोझिशन्स् त्याना सोडता येणे शक्य नसते.

एवढ्यात ही पोरे जास्त धीट होतात व जवानांच्या अंगावर एखादा दगड पडतो.

जवान जास्तच गरम होतात.

एवढ्यात गस्त घालणारी जीप येते. त्यात पाच-सात जवान असतात. त्याच्या हातात बंदुका व काडतुसे असतात.

हे जवान त्यांना ती पोरे कशी सतावीत आहेत ते सांगतात. त्याचा पारा वर जातो. ती जीप हे नवे लोक त्या पोराच्या पाठीमागे दौडवतात.

बिचारी पोरे जीव मुठीत धरून पळतात. मिळेल त्या घरात घुसतात.

शाळा बंद. कॉलेजेस् बंद !

मुलानी तरी करायचे काय ?

काही क्रिकेट खेळतात.

काही हा कर्फ्यूचा खेळ.

त्यामुळे गल्लीतील घरांची दारे या पोरांसाठी सताड उघडीच असतात. क्षणार्धात ही पोरे अदृश्य होतात.

हे बी. एस एफ. चे जवान चरफडतात. आता ही पोरे येथे होती, आम्हाला वेडावून दाखवीत होती. गेली कोठे ? हे बरोबर नाही. कोणी लाल शर्ट लक्षात ठेवतो तर कोणी निळी चड्डी!

हे जवान लपून बसतात.

पुन्हा मनाचा हिय्या करून एखादा पोरगा घराबाहेर पडतो.

त्याला पाहून आणखी दोन पोरे बाहेर पडतात. त्यात निळी चड्डी दिसते. इतराना सोडून हे जवान त्या निळ्या चड्डीस चारी बाजूनी कॉर्नर करतात. बाकीची पोरे घाबरून पळून जातात.

ही निळी चड्डी मात्र आता गोंधळून जाते. त्या बावरलेल्या अवस्थेत पळून जाणे अशक्य आहे ही एकदा जाणीव झाली की ते पोर हात जोडते, दया मागते, करुणा भाकते.

या जवानाना आता चेव चढलेला असतो. वेडावून दाखवायचं आहे काय, दगड मारायचे आहेत काय ? थांबा, दाखवितो– प्रत्येक जण त्या निळ्या चड्डीस दंडुक्याचे तडाखे हाणतो. तो पोर प्रतिकार करीत नाही हे पाहून त्या जवानाना जोर चढतो.

तो मुलगा बेभान झाला, बेशुद्ध पडला की त्यास ते सोडतात.

'सूवर कही का–'

'जानवर–'

'चलो, छोडो, अपुन पेट्रोलिंग करेंगे–'

पुन्हा जीप चालू होते व हमरस्त्यावर फिरू लागते.

या पोरास मिळणारा मार अनेक डोळे बघत होते हे या जवानांच्या ध्यानीमनीदेखील नसते.

लोकांच्या रागाचा पारा आता खूपच वाढलेला असतो. या जवानांच्या क्रौर्याचा सूड घेतला पाहिजे, त्यांना धडा शिकविला पाहिजे, असे त्याच्या मनाने घेतलेले असते.

पुन्हा गल्लीच्या तोंडाशी मुले जमतात आता त्याची संख्या जास्त असते दगडाबरोबर शिव्यांचा माराही चालू असतो. सभ्यतेचा, सुशिक्षितपणाचा बुरखा आता दूर झालेला असतो, आई-बहिणीवरूनच्या मिळमिळीत शिव्यांचा स्टॉक संपलेला असतो. जवानानीदेखील प्रत्युत्तर म्हणून अस्सल शिव्या देऊन झालेल्या असतात.

एकदम दुरून जवानांवर कोठून तरी वीट येते. त्यानंतर एखादी लादी. शहाबादी दगडाची लादी.

जवानास लागलेले असते. रक्तबबाळ झालेला असतो एखादा जवान. गस्त घालणाऱ्या जीपमधून त्यास सयाजी जनरल हॉस्पिटलमध्ये नेण्यात येते. बाकीचे जवान भडकलेले असतात.

हळूहळू अंधार होऊ लागतो.

एवढ्यात एक पोरटे स्कूटरचे जुने टायर घेऊन येते. त्याला रस्त्याच्या मध्यभागी ठेवते. आग लावते.

इतर पोरे पटापट रस्त्याच्या मध्यभागी मोठेमोठे धोंडे आणून टाकतात.

कोणी टेलिफोनचे खांब वाकवून रस्त्यात अडथळा निर्माण करतात.

आता रस्त्याने जीप जाऊ शकणार नसते.

पोरे जास्त निर्भय बनलेली असतात. कोणी तरी म्हणते, 'आपण माधवसिंग सोलंकीची ननामी जाळू!'

आणखी एक टायर आणले जाते.

त्याला आग लावण्यात येते.

पोरे रडतात, ओरडतात, हायहाय म्हणून नाचतात.

माधवसिंग सोलंकी गेले म्हणून आक्रोश करतात.

एवढ्यात एक मोठा धोंडा पुन्हा जवानावर भिरभिरत येतो.

जवानाचा राग असह्य होतो.

ते फायरिंग करतात.

त्याआधी 'अॅलर्ट 'चा सिग्नल देतात; पण सिग्नल ऐकण्याच्या मन:स्थितीत कोणी नसते.

प्रत्यक्ष फायरिंग झाल्यावर पोरात घबराट निर्माण होतो.

कोणी तरी रस्त्यात घायाळ पडलेला असतो. इतर पोरे पळून जातात.

कोणी तरी टेलिफोन करतो ,

अॅम्ब्युलन्स येते.

आणि या घायाळ झालेल्या पोराना हॉस्पिटलमध्ये घेऊन जातात.

हॉस्पिटलात संप असतो.

पण मेडिकलची मुले तशी समजूतदार आहेत. या घायाळ मुलाच्या मदतीला ती हॉस्पिटलात धावून जातात.

ऑपरेशनला मदत करतात.

आणि दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलच्या अवर्ण (दलित) प्रमुखाचे स्थानिक पेपरात स्टेटमेंट प्रसिद्ध होते. मुलांनी संप मागे खेचला आहे, ती हॉस्पिटलात कामावर रुजू झाली आहेत.

मुले भडकतात.

सुपरिंटेंडेंटला धमकावतात.

पत्रकारानेच ही विकृत बातमी दिली आहे अशी असहाय्यता सुपरिंटेडेंट व्यक्त करतात. मुलांचे समाधान होते.

पण काही मुले चांगलीच गरम होतात. कामावर कोण गेले त्याची चौकशी करतात. त्यांच्याविरुद्ध प्रचार सुरू होतो.

• मुलांत गट पडतात.

प्रचारयुद्ध सुरू होते.

प्रिन्सिपॉल गालात हसतात.

सुपरिटेंडेंट खूष होतात.

दोघाना डेप्युटी डायरेक्टर्स म्हणून नक्की बढती मिळणार असे त्याचे असिस्टंटस् पुटपुटतात.

मुले आपापसात भांडतच राहतात.

---

## अकरा फेब्रुवारी

---

दंगल कशी फुलली आहे.

रोज पोलीसलोक दंडुक्यांनी अनेकाचे हातपाय व डोकी जायबंद करीत आहेत.

सरकारी हॉस्पिटलात या जखमी–जायबंद रोग्याची ही गर्दी झाली आहे.

एक रजिस्ट्रार मी या सर्वांची काळजी घेईन असे सागतो. त्याचे शिक्षक हसतात. त्याची प्रबळ इच्छा असून त्याला ते काम दिले जात नाही.

तो डीनकडे जातो.

डीन प्राध्यापकाना फोन लावतात. प्राध्यापक त्यांना सुनावतात, तुमच्या जबाबदारीवर. तसे आम्हाला लिहून द्या !

डीन नाकारतात.

हा उत्साही मुलगा निरुत्साही होतो.

त्याचे अवर्ण भाईबंद कुरकुर करतात.

कर्सनदास त्याच्या बाजूने भांडण्यासाठी येतो. तावातावाने या बी. सी. मुलास सवर्ण डॉक्टरानी कसा अलगद बाजूला डावलला त्याचे वर्णन करतो. हा प्रकार मलाही पटत नाही. हा रजिस्ट्रार बी. सी. असला तरी त्याला ही ट्रीटमेंट ! 'दलिताच्या राजकारणा'चा लेखक जागृत होतो. याबाबतीत काही केलेच पाहिजे, असे मी कर्सनदासला सागतो.

म्हणून मी सर्जरीच्या प्राध्यापकाना भेटतो. ते खूप हसतात. मला राग येतो. त्याचे हसणे चालूच राहते.

'तुम्ही फॅमिली प्लॅनिंगवाले. म्हणून हा नवीन प्रकार करून बघायचा ठरविला आहे वाटते ?' ते हसत हसत विचारतात.

'म्हणजे ?'

'तुम्ही त्या रजिस्ट्रारचे वर्क बघितले आहे काय ? अहो, त्याला अजून अॅबसेस देखील ओपन करता येत नाही !'

'मग रजिस्ट्रार कसा झाला ?'

'राखीव जागेमुळे.'

'आणि एम. बी. बी. एस. ?'

'दयेमुळे.'

'दयेमुळे ? काय म्हणता ?'

'एकेक विषय क्लिअर करतात ही मुले सावकाश. जर धक्का मारला नाही तर पुन्हा साऱ्या विषयांना बसायला लागते. म्हणून आम्ही दया दाखवितो. असे हे लोक एम. बी. बी. एस. होतात. फार सवलती दिल्या की, हे लोक बिलकूल काम करीत नाहीत, अभ्यास करीत नाहीत !'

'आर यू शुअर ?'

'खरंच, अभ्यास करण्यासाठी काही तरी स्टिम्युलंट लागते. कधी गरिबी, कधी स्पर्धा, कधी पोरीवर इंप्रेशन मारणे तर कधी आई-बापांना लवकर मदत करणे.'

'पण–'

'पणबिण काही नाही. फार फुकट खायला मिळाले की, श्रीमंतांना अन्नाची गोडी वा प्रेम कमी होते, तसला प्रकार आहे. नाही तर स्वतः होऊन कोणी पुढे आल्यास आम्ही अशा परिस्थितीत काम नाकारायला मूर्ख आहोत काय ? पण काही तरी यायला तर पाहिजे ?'

---

## बारा फेब्रुवारी

---

'तुम्हा लोकाना यांतून नवनिर्माण व्हायची भीती वाटत नाही ?' मी गुजराथच्या मंत्रिमंडळातील एका प्रमुख मंत्र्यास प्रश्न केला.

'जराही नाही. नवनिर्माण एका विशिष्ट कारणासाठी झाले. ते कारण प्रत्येकास आकर्षून घेत असे. मुख्य म्हणजे त्या वेळेस सत्ताधारी पक्षातील एका गटाची सहानुभूती त्या चळवळीस होती. तिचे रूपांतर सक्रिय मदतीत झाले.'

'पण तुमच्या–तुमच्यात गटबाजी नाही ?'

'ती अटळ आहे; पण अशा बंडल कारणासाठी कोणी आपली राजकीय प्रतिष्ठा पणास लावणार नाही !'

'का ?'

'उघड आहे, यास जनतेचा पाठिंबा नाही. एम्. डी. एम्. एस्.

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

कोण होते? श्रीमंतांची ही चळवळ आहे. कशासाठी? तर अधिक श्रीमंत होण्यासाठी. त्याच्याशी जनतेचा संबंध काय? ही स्टीलबॉर्न बेबी आहे. आम्हाला तिची भीती वाटत नाही. खेडुत-आंदोलन एवढ्या जोरात सुरू झाले. काय झाले त्याचे? आपोआप बंद पडलेच का नाही? चिमणभाईचा पैसा आत असूनही. खेडूत-आंदोलन आम्हास घाबरवू शकले नाही, तेव्हा या डॉक्टरांच्या आंदोलनाला का आम्ही डरतो?'

'कमाल आहे!'

'कमाल कसली आली आहे? जास्त दिवस हे आंदोलन चालले तर रोग्याचे हाल होतील. ते तुम्हा डॉक्टरावर रागावतील. त्यांत तुमची प्रतिमा खलास होईल! डॉक्टर व त्याग याचे अतूट नाते आहे. जनतेस एकदा का कळले की ही प्रतिमा खोटी होती, आपण यांना उगाच मोठे मानीत होतो, हे तर व्यापारी आहेत तर तुमचे हाल होतील. तुमचा मान कमी होईल. तुम्हाला हे परवडणार नाही. आम्ही हे चांगले जाणतो. म्हणून या आंदोलनाने आमची झोप उडेल असे काहीच घडणार नाही!'

या संभाषणानंतर मी एका वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्यास भेटलो. मंत्रिमहोदयाचे म्हणणे खरे आहे असा अभिप्राय त्यांनी दिला.

'मग आंदोलन यशस्वी कशाने होते?'

'मंत्र्याच्या खुर्च्या धोक्यात आल्या पाहिजेत. त्याची तशी खात्री झाली तर ते काय वाटेल ते देतील!'

'कशावरून?'

'तुमचे अंतुले नाही का शरद जोशींशी चर्चा करण्यास तयार झाले? एकजात सारे विरोधी पुढारी दिंडीत सामील कशासाठी झाले? शेतकऱ्यांसाठी? विसरा, त्याचे विरोधी नेतृत्व धोक्यात आले म्हणून! तुमच्या डॉक्टराकडून तसे काय भय आहे सरकारला? तुम्ही का बसेस जाळणार होतात का दंगे करणार होतात? भाषणे, लेख-सरकार भाषणांनी डरत नाही!'

'पण या मेडिकोजूचा सप यशस्वी व्हावा यासाठी-'

'रोज लाख रुपये खर्च करा, गुंड पोसा व दंगे घडवून आणा! आठवड्यात मागण्या मंजूर! पण खरं सांगू? हे तुमचे काम नाही. तुम्ही आपले दवापाणी करा. त्यासाठी निराळ्या जातीचे लोक लागतात!'

'म्हणजे?'

'पक्के, मुरलेले राजकारणी! स्विचचे बटन फक्त यांच्या हातात. लाइटचा गोळा दूर कोठे तरी लागतो व प्रकाश देतो. बटण कोणास दिसत नाही. लोकांना वाटते, हा प्रक्षोभ आपोआप होतो. तुमच्या महाराष्ट्रातल्या शेतकरी दिंडीचा खर्च काय असेल?'

'काही कल्पना नाही.'

'कमसे कम् रोज दोन-तीन लाख रुपये! दहा-पंधरा दिवसांचा रोजचा तीन लाख खर्च! कोठून येतात हे पैसे? थोडा विचार करा!'

'हे भयंकर आहे!'

'म्हणून म्हटले, तुमचे काम नाही. तुम्ही तुमच्या लोकांना सांगा, तुम्ही आपले कामावर परत जा! पगार जाईल, रोग्यांचा राग वाढेल. उगाच सर्व बाजूनी तुमचा पराजय होईल!'

'पटणार नाही त्यांना, अजून बच्चे आहेत हे तरुण डॉक्टर्स!'

'फुकट मार खातील आमचा!'

## पंधरा फेब्रुवारी

हा युवकनेता मला आवडून गेला आहे. चांगला बोलतो. आक्रमक. आवाज बुलंद आहे. मुलांवर चांगली मोहिनी टाकतो. मुले त्यासाठी प्राण टाकतात; पण हा आहे इंजिनियरिंगचा विद्यार्थी!

आणि नेतृत्व करतो आहे मेडिकलच्या मुलाचे. जी. एस. आहे. चालायचंच!

सतीश शाह डॉक्टर आले होते. डॉक्टर खरे; पण अर्थकारणात तज्ज्ञ, राजकारण अर्थशास्त्रीय दृष्टीतून पहाणारे.

हा नेता फार दिवस असा स्वतंत्र रहाणार नाही. लौकरच त्यास कोणाचा तरी पक्ष जॉइन करावा लागेल.

आपला अश्विनभाई असाच एके काळी पॉवरबाज जी. एस. होता. पुढे बेकार पदवीधर झाला. किती दिवस बेकार रहाणार? आपल्या गॉडफादरने त्यास पी. ए. नेमला आणि अश्विनभाईची पॉवर संपली!

हीच गत या युवकनेत्याची होणार!

मी सतीशभाईस विचारतो, 'पण खात्री आहे तुमची?'

'किती वेळ बेकार राहतील ही मुले? आणि ही मुले नोकऱ्या करतील? एकदा का पुढारीपणाचा नशा सुरू झाला की ह्याच्याच्याने नोकरी होणार होती? सोडा-लेमन विकणारी पोरे थेटरात रोज दीड रुपयावर का रहातात? त्याना फुकट सिनेमा पहावयास मिळतो. त्याची नशा चढते. तसेच आहे. यांना राजकारणाची नशा चढली आहे. आता ती मुक्त नाही राहू शकत!'

'पण काही उपयोगी काम करतील-'

'राजकारणात एकदा का शिरले की त्याची उपयुक्तता संपली! फक्त स्वत.चे नेतृत्व, स्वत.ची सत्ता, स्वत.चे साम्राज्य! बस्स, दुसरे काही सुचत नाही, दिसत नाही. राइट देम ऑफ!'

'वेट अँड वॉच!'

'बघाल तुम्ही, माझे शब्द खरे झालेच पाहिजेत!' □

[डायरीतील आणखी काही पाने पुढील अंकी.]